# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**सोमवार, दि. १९.६.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

सोमवार, दि. १९.६.२००६ रोजी महापालिकेची सर्वसाधारण सभा मा.उप महापौर श्री.भगवान देविदासराव घडमोडे, यांच्या अध्यतेखाली महापालिकेच्या मुख्य इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.४५ वा. वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त,अधिकारी वर्ग यांचेसह खालील स.सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०२. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
०३. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०४. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०५. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०६. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०७. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
०८. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
०९. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१०. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
११. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१२. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१३. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१४. स.स.सौ.रजनी रमेश जोशी
१५. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१६. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१७. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
१८. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
१९. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२०. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२१. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२२. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२३. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२४. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२५. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२६. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
२७. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन
२८. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
२९. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३०. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३१. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव

३२. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३३. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३४. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३५. स.स.श्री.खान निसार मो.खान
३६. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
३७. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३८. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
३९. स.स.सौ.राऊत छाया विलास
४०. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४१. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४२. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४३. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४४. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४५. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
४६. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
४७. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४८. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४९. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५०. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५२. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५३. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५४. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५५. स.स.श्री.खुडे विजय किसन
५६. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
५७. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५८. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५९. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६०. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६२. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६३. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६४. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६५. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६६. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६७. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६९. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७०. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७२. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७३. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा

७४. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७५. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७६. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७७. स.स.श्री.बारवाल गजानन
७८. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
७९. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
८०. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**संवाद :**

श्री. अ.रशिद खान(मामू) : सभा घेण्यासाठी कोरम पूर्ण होत नाही.

श्री. बाबासाहेब डांगे : कोरम नसल्याने सभा तहकुब करावी.

मा.उप महापौर : १५ मिनिटासाठी सभा तहकुब करण्यात येते.

तहकुब करण्यात आलेली सभा पुन्हा १२.०० वाजता सुरू झाली.

श्री. संजय जोशी : सभा घेणयासाठी आता देखील कोरम पूर्ण होत नाही त्यासाठी पुन्हा सभा तहकुब करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : सभा तहकुब करावी.

मा. उप महापौर : १० मिनिटासाठी सभा तहकुब करण्यात येते.

तहकुब करण्यातज आलेली सभा पुन्हा १२.१५ वाजता सुरू झाली.

श्री. अ.रशिद खान(मामू) : शहरातील काही टपऱ्या हटविण्याचे काम चालू आहे. मा. हायकोर्टचा आदेश हा ४ वर्षापूर्वीचा आहे. आपल्या वकीलाने सांगितले होते की, टपऱ्या आपण दिलेल्या आहेत. त्यावेळी रस्त्यात आलेले घरे,टपऱ्या तोडल्या त्यांना आपण पर्यायी जागा दिलेल्या आहेत. हायकोर्टाचा आदेश असा आहे की, ६०,८०,१०० फुट रोडवर टपऱ्या देऊ नये त्याच्यापेक्षा १०-२० फुटाची जागा आहे तर तेथे टपऱ्यांना जागा देण्याविषयी विचार केला जावा. सन १९९५-९६ या वर्षी या सभागृहाने एक कमिटी नेमली होती त्याचे चेअरमन मुश्ताक अहमद होते. श्री.प्रकाश निकाळजे,श्री.प्रभाकर विधाते,श्री.सुदाम सोनवणे,श्री.महादेव सुर्यवंशी, माया लाडवाणी,डॉ.कराड इत्यादी सदस्य होते. या मिटीचे काम असे होते की, शहरात टपऱ्या कोठे कोठे द्यावयाच्या कोठे कोठे ठेवावयाच्या त्यावेळी जी घरे,टपऱ्या तोडल्या त्यांना आपण पर्यायी जागा दिलेल्या आहेत. आज आपण मा.हायकोर्टाचा आदेश म्हणून काम करीत आहोत. हा आदेश ४ वर्षापूर्वीचा आहे. आता पर्यन्त आपण बसून होतो. तेव्हा पासूनच हे काम चालू असते तर हे आता काही वेगळं वाटलं नसत. मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचा इन्कार नाही. आमची विनंती आहे की, सन १९९५-९६ साली मा.हायकोर्टाच्या आदेशानुसार आपण जे अतिक्रमणे पाडली होती त्या लोकांना आपण ६०,८०,१०० फुटाचा रोड सोडून बाजूला जी १०,२० फुट जागा होती त्यांना तेथे जागा दिल्या होत्या पण आता आपण त्या टपऱ्या देखील पाडतो आहोत यांना जागा कोठे देणार आहात याचा देखील निर्णय होणे आवश्यक आहे. ज्या भागात आपण अतिक्रमण पाडणार

आहात तेथे अॅटो रिक्षा लावून अलाऊन्स करून सांगावे की, २ घंटयाच्या आता आपण जागा खाली करावी. आपण कुठलीही सूचना न देता जातो आणि त्यांचे नुकसान होते. त्यांना तेथून सामान,टपऱ्या काढण्यासाठी वेळ द्यावा असे आमचे म्हणणे आहे. अतिक्रमण हटविण्यास आमचा विरोध नाही आपण याचाही खुलासा करावा की, आपण अतिक्रमण केलेल्या लोकांना म्हणतो की, ही जागा सोडून द्या आम्ही तुम्हाला पर्यायी जागा उपलब्ध करून देऊ, पण कसे देणार आहोत ? जर आपण देऊ शकत नाही तर, त्यांना सांगुन काय उपयोग जर देऊ शकत असलो तर आपणांकडे हे अधिकार आहेत का? की त्यांना आपण पर्यायी जागेची व्यवस्था करून देऊ शकु? महापौर साहेब, जेथे अतिक्रमण हटविण्यास जातात त्यांना म्हणतात की, तुम्हाला पर्यायी जागेची व्यवस्था करून देऊ ते नागरिक स.नगरसेवकांना म्हणतात की, आपण आम्हाला जागा का देत नाहीत आपण कुठे जागा देणार आहात याचा तरी खुलासा करावा. ज्या नागरिकांना आपण बेरोजगार करत आहोत त्याचे जिम्मेदार कोण असणार आहे त्यावेळी जी कमिटी नेमली होती त्यांनी हया टपऱ्या दिलेल्या आहेत त्या सर्व लिगल आहेत आपण भाडे घेणे बंद केले ते ठिक आहे पण मा.हायकोर्टात आपल्या वकीलांनी काही अॅफिडेव्हिट देऊन काही केलेले नाही आपण केवळ तोंडी चर्चा केलेली आहे. तोंडी चर्चा आणि अॅफि डेव्हिट यात काही फरक आहे किंवा नाही आपण याचा खुलासा करावा.

श्री.संजय जोशी : सर्वात प्रथम मी मा.आयुक्तांचे,मा.महापौर यांचे,अधिकारी वर्ग तसेच उपायुक्त श्री आनंदकर यांचे मन:पुर्वक अभिनंदन करतो की, शहरात जी अतिक्रमण विरोधी मोहिम चालविलेली आहे ती यापूर्वी एवढी प्रभावीपणे चालू नव्हती आता तिला चांगलाच वेग आलेला आहे. श्री .आनंदकर आणि सर्व प्रशासकीय अधिकारी यांनी ही अतिक्रमण विरोधीची मोहिम कुठल्याही प्रकारचा गोंधळ न होता अतिशय शांततेने ही परिस्थिती हाताळलेली आहे. विशेष आनंदाची गोष्ट अशी आहे की, प्रशासन हे काम करीत असतांना स.नगरसेवक हे अतिक्रमणे काढण्यासाठी त्या जागेवर येऊन हजर असतात त्यामुळे त्या नगरसेवकांचे देखील अभिनंदन करतो. प्रशासनाने ज्या मुख्य रस्त्यावरच्या टपऱ्या काढल्यात. त्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन करतो. आताच रशिद मामू म्हणतात की, रस्त्याच्या बाजूची जी जागा आहे त्या जाग्यावरच्या टपऱ्या घरे पाडली तर ती जागा महानगरपालिकेची आहे का? याचा देखील खुलासा व्हावा. ती जागा महानगरपालिकेची असेल तर त्या जागेवर कोणीही बसलेले चालेल का याचाही खुलासा व्हावा.

सौ.लता दलाल : आताच स.सदस्य श्री.संजयजी जोशी यांनी मा.महापौर व प्रशासनाच्या अभिनंदनाचा विषय मांडला आहे त्याला माझे पुर्णत: अनुमोदन आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, माजी महापौर श्री.अब्दुल रशिद मामु यांनी सभागृहात काही प्रश्न उपस्थित केले आहे. सन १९९५-९६ च्या बॉडीत आम्ही पण होतो. त्यावेळी सर्वे झाला होता हे निश्चित आहे. पण अंतिम निर्णय झालेला नव्हता. त्यावेळी आम्ही सर्वजण होतो. कोणत्या टपऱ्या काढायच्या, कोणत्या ठेवायच्या याचा अहवाल आला होता पण अंतिम निर्णय झाला नव्हता. आता जवळपास १० वर्षे झाली आहेत. त्यावेळपासून आता पर्यन्त सर्वच शहरात जेथे परवाना नाही अशा ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे हे हटविण्यासाठी मा.महापौर,मा.प्रशासन यांनी जी भूमिका घेतली आहे त्याबद्दल त्यांचे कौतूक आहे. तसेच हे काम करीत असतांना सर्वच नगरसेवकांनी कुठलाही पक्षपात न करता गंभीरपणे उभे राहिले ते ही अभिनंदनास पात्र आहेत. मा.आयुक्त म्हणत होते की, नगरसेवक अडथळा

निर्माण करतात, पण कुठल्याही नगरसेवकांनी अडथळा केलेला नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की, आपण जे अतिक्रमण पाडत आहोत त्यांना सर्वांनाच पर्यायी जागा देणे शक्य आहे का? जर आपण पर्यायी जागेची व्यवस्था करून दिली तर ही या शहरात एक प्रथा पडेल की, कुठेही अतिक्रमण करा आणि हक्काची जागा घ्या. ज्यांनी ज्यांनी खरोखरच अतिक्रमण केले आहे त्यांना कुठल्याही प्रकारची पर्यायी जागा उपलब्ध करून देऊ नये. ज्यांना खरोखरच आवश्यकता आहे जसे की, अपंग,विधवा स्त्रीया तसेच ज्यांच्या घरात कोणी कमावता नाही अशाचा विचार या ठिकाणी व्हावा अशी विनंती आहे.

श्री. अ.रशिद खान(मामू) : स.सदस्य म्हणतात की, त्या समितीने याचा अंतिम निर्णय घेतला नव्हता त्या समितीने असा निर्णय घेतला होता की, ज्याचे अतिक्रमण आपण तोडत आहोत ज्यांची घरे,टपऱ्या तोडत आहोत त्यांना पर्यायी जागा द्यावीच लागणार आहे. आपण आता म्हणता की,मा.हायकोर्टाच्या आदेशानुसार आपण अतिक्रमणे हटविण्याचे काम करत आहोत पण आपण केवळ टपऱ्या काढण्याचे काम करत आहात. आम्ही आपणला कुठेही अडथळा करणार नाही आपण हे चांगले काम करत आहात. का ठराव सर्वानुमते मंजूर करून घ्यावा. आपणला या कामासाठी कुठलाही नगरसेवक अडथळा निर्माण करून कोर्टात जात नाही. पण मा.हायकोर्टाचा आदेश हा ही होता की, पार्कींगच्या जागेवर बांधलेले घरे,टपऱ्या तोडाव्यात पण आपण या जागा सोडून दिलेल्या आहेत आपण काहींना सोडून काही धरून काम करत आहात. सर्व ठिकाणचे अतिक्रमणे पाडण्यात आली पाहिजेत. सगळयांना एका अधिकाराखालीच अतिक्रमणे हटविण्याची कामे करावीत. काहीची अतिक्रमणे पाडली जातात तर काहीची पाडली जात नाही असे का होते. मा.हायकोर्टाच्या निर्णयानुसार आपण टपऱ्याचे भाडे घेणे बंद केले आहे हायकोर्टाचा केवळ असाच आदेश नहता की, टपऱ्या हटवा,त्यांचा असा आदेश होता की, ६०-८० फुट रस्त्यामध्ये टपऱ्या ठेऊ नका. अतिक्रमणे होऊ देऊ नका पण आपण तर टपऱ्या उचलण्याचेच काम करत आहात. ज्यांना आपण जागा दिल्या होत्या, आपण अधिकृत आणि अनाधिकृत दोन्ही टपऱ्या काढायचे काम चालू केले आहे. आम्ही कुठे म्हणतो की, टपऱ्या काढू नका, शहर सुंदर करू नका, पण जनतेचाही विचार केला पाहिजे त्यांना आपण बेरोजगार करतो आहे ही जनता आपलीच आहे त्यांचा विचार केला पाहिजे केवळ टपऱ्या काढायचा आदेश दिलेला नाही तर, ६०-८० फुट रस्ता सोडून टपरी द्या. पार्कींगच्या जागा मोकळया कराव्यात आम्ही आपण करत असलेल्या कामाला विरोध करत नाही. आम्ही केवळ आपणाला सांगत आहोत.

सौ.लता दलाल : स.माजी महापौर अब्दुल रशिंद मामू म्हणतात की, १९९६ च्या जनरल बॉडीचा ठराव झालेला होता, अंतिम निर्णय आला होता. पण त्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालेली नव्हती. सदर निर्णय १० वर्षापूर्वीचा आहे. या १० वर्षात शहर वाढलेले आहे. त्यावेळी हा ठराव झाल्यानंतर आपण ज्या टपऱ्या दिल्या होत्या त्यांना देखील स्थगिती देण्यात आली होती. लिगल आहेत म्हणतात पण त्यानी केवळ अर्ज देऊन मी येथे बसतो बसा त्यावर कुठलाही विचार झालेला नाही. संबंध शहरामध्ये १० वर्षात बरीच अतिक्रमणे झालेली आहेत ती पाडल्याच गेली पाहिजे. त्यावेळी झालेला ठराव आणि आता प्रशासनाची भूमिका काय आहे याचा ही खुलासा या ठिकाणी झाला पाहिजे. कारण कोणाचाही गैरसमज होता कामा नये. सर्वच नगरसेवकांनी या कामासाठी संपूर्ण सहकार्य करून ही अतिक्रमण

हटाव मोहीम राबविली जावी. मी म्हणाले होते की, ज्यांना खरच गरज आहे जसे की, विधवा महिला,अपंग,ज्यांच्या घरात कोणी कमावता नाही अशानाच पर्यायी जागा उपलब्ध करून दिल्या गेल्या पाहिजेत. यासाठी एक यादी करावी. सर्वानाच पर्यायी जागा देऊ नये. कारण कोणीही अतिक्रमण करेल आणि पर्यायी जागा मागेल यासाठी प्रशासनाने खंबीर भूमिका घेतली पाहिजेत. ज्यांना खरोखरच गरज आहे. त्यांनाच केवळ पर्यायी जागा उपलब्ध करून दिली पाहिजे.

श्री.मुजीब खान : सध्या जी मोहीम चालू आहे तिला माझा विरोध नाही. रोषनगेट चंपा मस्जिद या ठिकाणी रस्त्याचे भूसंपादन होऊन मोबदला ही देण्यात आलेला आहे पण त्यावेळी मावेजा फार कमी मिळाला होता. त्यावेळचे महापौर यांनी त्यांना पर्यायी जागा देऊन एक एक दुकान सेंट्रल नाक्याजवळ भाडयाने देऊ असा निर्णय घेतला होता. त्यांना ज्या जागा दिल्या त्यांनी पुढे सरकुन थोडे अतिक्रमण केले आहे की म्हणत नाही की, त्यांनी अतिक्रमण केले नाही. तसेच शहागंज दर्ग्याजवळ देखील अतिक्रमणे काढून त्या ठिकाणी काहीना टपऱ्या देण्यात आल्या होत्या. त्यावेळी लोकांनी महानगरपालिकेला स्वत:हून या जागा दिल्या होत्या. त्यासोबत आता अन्याय होऊ नये. जेवढे क्षेत्र त्यांना दिले होते तेवढे त्यांना द्यावे सध्या चालू असलेल्या मोहिमेला सर्वच नगरसेवक मदत करतील यात वाद नाही. जे अनाधिकृत आहेत अतिक्रमणे आहेत त्यांना पाडा. सध्या मोठ-मोठे बिल्डर्स ओपनस्पेस पार्कींगची जागा ठेवत नाही ते संपूर्णत: हटविली पाहिजे. महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. विकास कामे,खुली जागा पार्कींगची जागा सोडलेली होती ती आज आहे का नाही ते ही पहावे. मी स्थायी समिती सभेत ही बोललो होतो. २-२ खुल्या जागेवर अतिक्रमण आहे ते काढण्यात यावे.

श्री.विनायक पांडे : सध्या जे अतिक्रमण हटाव मोहीम चालू आहे ती अत्यंत चांगली आहे. या मोहिमे अंतर्गत जे काम होत आहे ते चांगले आहे. शहरातील जयसिंगपुरा, बेगमपुरा, मकबरा समोरचा परिसर या ठिकाणचा रस्ता जेवढी काही महानगरपालिकेच्या ताब्यातील जागा आहे त्या ठिकाणी झालेली सर्वच अतिक्रमणे पाडण्यात यावी ही मागणी मी आपणांकडे करत आहे.

सौ.अनिता घोडेले : आपण अतिक्रमितांना पुनर्वसनासाठी नक्षत्रवाडीत जागा देणार आहोत असे म्हणता, पण तेथे नगरसेवक आहे नगरसेवकांला विश्वासात घेऊनच पुढील काम केले पाहिजे. सदरील जागा ही महानगरपालिकेची आहे किंवा नाही याचाही विचार केला पाहिजे, त्यानंतर ती जागा जर महारगरपालिकेची आहे तर, आरक्षित आहे का? तसा अधिकार महानगरपालिकेला आहे का? प्लॉट देण्याची की, ती जागा कोणाच्या मालकीची आहे. जर तेथे गायरान जमिन असेल तर मा.जिल्हाधिकारी यांचेकडून घेतली आहे का? माझा विरोध आहे.

श्री.गजानन बारवाल : या ठिकाणी माझे सहकारी मित्र श्री.अब्दुल रशिद मामू, सौ.जोशी, सौ.लता दलाल, स.मुजीब खान,स.पांडे,सौ.घोडेले यांनी काही मते मांडली आहेत. सर्वप्रथम मी महानगरपालिकेचे, मा.महापौर व प्रशासनांचे अभिनंदन करतो की, अतिक्रमण हटाव मोहिम ही अत्यंत सुव्यवस्थित चालू आहे. आपल्याकडून कळत न कळत काही चुका झाल्या असतील. मा.हायकोर्टाचा नेमका निर्णय काय होता, कमेटीचा अहवाल काय होता याचा या ठिकाणी विचार व्हावा. आताच स.सदस्या सौ.घोडेले अनिता यांनी सांगितले की, आपण अतिक्रमण काढलेल्या लोकांना कुठे पर्यायी जागा देणार आहात, ज्यांना आपण परवाना दिला होता त्यांचे

आपण पुर्नवसन करणार आहात का? त्यांना आपण पैसे दिले होते की, टपऱ्या दिल्या होत्या, आपण कोणाला टपऱ्या दिल्या होत्या ज्यांची जागा होती त्यांनाच दिल्या होत्या की, नाही हा ही या ठिकाणी मोठा प्रश्न आहे. आपण जे अतिक्रमण पाडत आहात त्याचे नेमकं धोरण काय आहे, आपण ३० मिटरचे, १५ मिटरचे रस्ते तयार करणार आहात की, जे नियमानुसार आहेत ते करणार आहात हा ही खुप मोठा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत आहे. स.सदस्य अब्दुल रशिद खान मामुने सांगितले की, काही लोकांचे पुर्नवसन होणे आवश्यक आहे. स्थायी समिती सभेमध्ये चांगला निर्णय चेअरमन साहेबांनी दिला होता की, अपंग व अंधांना जागा दिल्या आहेत आपण अशाप्रकारचे जे चांगले पुर्नवसन केले तशा प्रकारचे हे पुर्नवसन होणे आवश्यक आहे. आपण आरक्षित जागा आपल्या ताब्यात घेऊन मोठे टपरी मार्केट तयार करून त्यांना टपरी देण्यात याव्यात. कोणावरही अन्याय होणार नाही याची दखल प्रशासनाने घेतली पाहिजे.

श्री.काशिनाथ कोकाटे : अतिक्रमण हटाव मोहिम प्रभावीपणे राबविण्यांत येत आहेत. सर्व स.सदस्यांनी या मोहिमेवर आपले मत व्यक्त केले आहे. यातील महत्वाची बाब म्हणजे या ठिकाणी ही मोहिम राबवित असतांना आपल्याला काही गोष्टी अडचणीच्या वाटत असतील. ज्याप्रमाणे अन्न,वस्त्र,निवारा या गोष्टी जशा महत्वाच्या आहेत तशी शहर सौंदर्यीकरण ही गोष्ट देखील महत्वाची आहे. शहर सुंदर दिसण्यासाठी रोडची साफसफाई करणे, रस्ते स्वच्छ करणे व मोठे असणे आवश्यक आहे असे शहर विकास आराखडयात म्हटले आहे. सध्या जी मोहिम चालू आहे. त्या मोहिमेस सर्वच लोकप्रतिनिधींनी मदत केली आहे, करीत आहे. रस्ता रूंदीकरण करण्यासाठी काहीच्या प्रॉपटर्या गेल्या आहेत त्यांना पर्यायी जागा देणे हे आपल्या नियमावलीमध्ये आहे. आपण मागे जेव्हा अतिक्रमितांना जागा दिल्या होत्या त्या आता जर काढत असलो तर ते अन्याय कारक आहे. आपण सध्या जी मोहिम राबवित आहोत यात नियोजन करणे आवश्यक आहे. टपरी समिती स्थापन करण्यात आली होती त्यात स.सदस्य तसेच अधिकारी वर्गाचा सहभाग होता. त्यावेळी आम्ही सभागृहात होतो त्यावेळी जी समिती स्थापन केली त्याचा अंतिम अहवाल आलेला नव्हता. त्यानंतर बॉडी बदलली आणि त्या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही. परंतू आज आपण पुन्हा जर लोकांना उठवून त्यांचे पुर्नवसन करत असाल तर त्यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. आपण फक्त टपऱ्या काढून शहराच्या रहदारीचा अडथळा दुर होणार नाही तर सर्वात मोठा रहदारी प्रश्न हा वाहनतळाचा आहे. पार्कींगचा आहे ज्या ठिकाणी पार्कींगसाठी जागा दिलेली आहे त्या ठिकाणी जर कोणी अतिक्रमण केले असेल तर, त्याठिकाणचे अतिक्रमण काढणे आवश्यक आहे. मा. उच्च न्यायालयाचा आदेशाचे जर पालन करावयचो असेल तर त्याचे समप्रमाणात अर्थ लावला पाहिजे. आपल्या सोयीप्रमाणे अर्थ प्रशासनाने लावू नये पार्कींगच्या जागा खाली करावयाच्या असतील तर त्या सर्वच ठिकाणच्या खाली करा समप्रमाणात न्याय द्या. प्रामाणिकपणे कामे करा. एका ठिकाणी गोरगरीबांच्या टपऱ्या काढून त्याचे किती तरी नुकसान करतो आहे आणि दुर्दैवी बाब अशी आहे की, २००३ मध्ये सभागृह नेते श्री.राधाकिसन गायकवाड यांनी पडेगांव स्मशानभूमिचा प्रश्न या ठिकाणी मांडला होता. त्याबाबत टाऊन प्लॅनिंग व मा. उप आयुक्तांना पत्र देखील दिले गेले. त्यावेळी प्रशासनाने बिल्डर्सला प्रोत्साहन दिले. डी.पी.रोडवर आज बिल्डींग उभ्या राहिल्या. अशाप्रकारचे दुतर्फी धोरण प्रशासन चालवत आहे.

ज्याचा निषेध करण्याची गरज आहे. गावठाण जमिनीवर जर अतिक्रमण होत असेल तर त्याबाबत कडक कार्यवाही झाली पाहिजे. याबाबत जाणिवपूर्वक सवलत दिली जाते असा माझा आरोप आहे. पुर्नवसनासाठी प्रशासनाने जागा सुचवावयाची असते. प्रशासकीय अधिकारी निकम,उपायुक्त तसेच नगर रचना विभाग यांना देखील याची माहिती आहे. तरी संबंधीत बिल्डर्सला याची कशी काय परवानगी दिली जाते याचा खुलासा आताच्या आता मागवून घ्यावा अशी विनंती करतो. तसेच सध्या आपण अतिक्रमण काढत असतांना त्यांना सांगतो की, तुम्हाला पर्यायी जागा देणार आहोत. या जागा देण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला तसेच या सभागृहाला आहे. पण जागा नेमक्या कुठे देणार आहोत, कोणाला देणार आहोत याचा देखील आज निर्णय घ्या. नाही तर त्या गरीब जनतेला भुलथापा देऊ नये त्यांना आताच सांगा की, तुमचे पुर्नवसन करणार नाही. आतापर्यन्त सदरील विषयाबाबत कुठल्याही प्रकारचा ठराव केलेला नाही. अशा प्रकारचा आजच ठराव करून त्यास मंजूरी द्यावी. अद्याप सभागृहास विश्वासात घेतलेले नाही. सुंदर शहर करावयाचे असे आपण म्हणता पण त्या गरीब जनतेच्या नुसत्या टपऱ्या काढून त्यांना भुलथापा देऊन चालणार नाही त्यामुळे सर्वच स.सदस्य अडचणीत येणार आहेत. आपण आज पर्यन्त अशा प्रकारचा निर्णय या सभेत घेतलेला नाही आणि तिकडे घोषणा करत आहात हे चुकीचे आहे. शहराच्या बाहेर हॉकर झोन तयार करून त्या ठिकाणी सर्वांना बसण्याची व्यवस्था केली पाहिजे. तसेच क्रांतीचौक ते विमानतळ हा रस्ता १५० फुटाचा आहे. जवळपास त्या रस्त्यावरचे सर्वच अतिक्रमण काढले आहेत. पण १०% अतिक्रमण आज देखील कायम आहे ते अतिक्रमण प्रशासनाच्या वतीने का काढण्यात येत नाही याचा देखील खुलासा करावा. केवळ गोरगरीब जनतेचे नुकसान करून चालणार नाही. मिटमिटा पडेगांव आणि क्रांतीचौक ते विमानतळ या रस्त्याचा विचार करून खुलासा करावा यावर निर्णय घ्यावा.

श्री.सतिश कटकटे : रविवार आठवडी बाजार असतो त्याठिकाणी मा.महापौर आणि मा.आयुक्त यांनी स्वत: पहाणी केली आहे तेथे इतिहासीक दरवाजा आहे. पहाणी करून ६-७ महिने झाले आहेत. सदरील ठिकाणी फार अतिक्रमण झाले आहे. महानगरपालिकेची जागा आहे त्या ठिकाणी काय कार्यवाही करणार आहात याचा खुलासा करावा.

श्री.मुजीब खान : महानगरपालिकेने अपंगाना वर्षाला ३०००/- हजार रूपये भाडयाने टपऱ्या दिल्या त्यानंतर एक मॉडेल तयार करून ३०-३५ हजार रूपयाची एक टपरी देण्याचा प्रस्ताव ठेवला पण त्या गरीबांची एवढी ऐपत नाही त्यांनी हया टपऱ्या कशा काय घ्याव्यात. संत एकनाथ रंगमंदीरात कार्यक्रम घेण्यात आला. ज्यांचे उपजिवीकेसाठी २ वेळचे अन्न नाही ३ महिने झाले यावर या सभागृहाने विचार केला पाहिजे की, ३५-४० हजार रूपये ते कोठून आणणार त्या गरीब जनतेला केवळ आश्वासन देऊ नका.

श्री.महेश माळवतकर : गेले काही दिवस शहरामध्ये अतिक्रमण पाडण्याची मोहिम चालू झालेली आहे. मा.आयुक्त,मा.महापौर, उपायुक्त तसेच त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले पाहिजे. परंतू अतिक्रमण पाडण्याची कार्यवाही ही दिखावा करू नका, हे काम करीत असतांना प्रशासनाने एक काळजी घेतली पाहिजे ज्या टपऱ्या वर्षानुवर्षे आहेत त्यांना नोटीसा देऊन, त्यांना हालवयाला वेळ दिला पाहिजे. या सुशिक्षित बेरोजगारांच्या टपऱ्यांचे १००% नुकसान होणार नाही याची देखील आपण

काळजी घेतली पाहिजे. अतिक्रमण काढलेच पाहिजे. अतिक्रमण हटविण्याचे काम हे थांबले नाही पाहिजे शहरातील सर्वच भागातील अतिक्रमण काढले गेले पाहिजे.

सौ.लता दलाल : मा.आयुक्त या ठिकाणी आलेले आहेत. आपले या ठिकाणी सर्वच स.सदस्यांनी अभिनंदन केले पण आपण येथे हजर नसल्यामुळे आपण ते ऐकु शकला नाहीत त्यामुळे पुन्हा सर्व सभागृहाच्या वतीने आपले अभिनंदन करते.

श्री.बन्सीलाल गांगवे : गेल्या सर्वसाधारण सभेमध्ये मी मुकूंदवाडी भागातील रस्त्यावरचे अतिक्रमण काढण्याबाबत मुद्या मांडला होता. तेथील टपरी मार्केट हे पुढे आलेले आहे. त्या संदर्भात मा.आयुक्तांनी आठ दिवसांची मुदत मागितली होती पण हे सांगुन आता एक महिना पुर्ण झाला पण अजूनही तेथील अतिक्रमण हटविले गेले नाही ते सोडून देता मुकूंदवाडी भागातील संजयनगर,विकासनगर स्लम भागातील ड्रेनेज लाईनवरील अतिक्रमणामुळे रस्ता ब्लाक झाला आहे. मुकूंदवाडी रस्त्यावरचे अतिक्रमण कधी काढणार आहात याचा खुलासा करावा.

डॉ.भागवत कराड : आताच सर्व स.सदस्यांने मा.महापौर,मा.आयुक्त,नगरसेवक यांचे अभिनंदन केले आहे मी सुध्दा त्याच मताचा आहे. मी सुध्दा स.नगरसेवकांचे अभिनंदन करतो की, त्यांनी सदरील टपऱ्या काढत असतांना कोणीही अडथळा केलेला नाही. पण अतिक्रमण काढत असतांना स.नगरसेवकांच्या भावना लक्षात घेतल्या पाहिजे. कुठल्याही प्रकारचा भेदभाव,गरीब असेल किंवा श्रीमंत असेल, कुठल्याही प्रकारचा भेदभाव झाला नाही पाहिजे. १९९६ मध्ये याच सभागृहात टपरी कमिटी झाली होती. त्या कमिटीचा मी सदस्य होतो त्यावेळी झालेल्या कार्यवाहीत शहरामध्ये किती टपऱ्या लिगल आहेत आणि किती टपऱ्या अनाधिकृत आहेत याची सर्व माहिती महानगरपालिकेत आहे. आता प्रशासनाने चांगले पाऊल उचलले आहे. आपण ज्या टपऱ्यांना मान्यता दिलेली आहे त्याचे आपण खरच पुर्नवसन करणार आहात का? मी आताच मा.आयुक्तांच्या कॅबीनमध्ये चर्चा करत होतो त्यावेळी मी त्यांना विचारले की, खरच टपरीमुक्त शहर करणार आहात का? काही जागांवर स्थगिती आहे का, टपऱ्यासाठी जागा निश्चित करणार का, बसस्थानक,घाटी या ठिकाणी जागा निश्चित करावी. टपऱ्या बदल सर्व माहिती गोळा करा त्यावेळच्या कमिटीनुसार किंवा पुन्हा एकदा एक कमिटी नेमावी आणि याची पूर्ण माहिती घेऊनच कार्यवाही करावी आणि हे सर्व करत असतांना कुठल्याही प्रकारचा भेदभाव करू नये एवढेच मला म्हणावयाचे आहे.

श्री.अ.रशिदखान(मामू) : अतिक्रमणातील टपऱ्या काढत असतांना मा.महापौर,आणि मा.आयुक्त म्हणतात की, आम्ही टपऱ्या देणार आहोत आपणा दोघांनाही याचा अधिकार आहेत का? देता येत नाही तर मग महापौर आणि कमिशनर दोघेही चुकीचे काम करत होते का? पुर्वी केले ते चूकीचे आहे का, सर्वसाधारण सभेने अधिकार दिले होते. पण ज्यावेळी कमिटी नेमली होती तिलाच याचा अधिकार होता. त्यांनी दिलेल्या टपऱ्या दिल्या त्या आपण काढत आहात, आता आपण देणाऱ्या टपऱ्या पुढे येणार काढतील मग यामुळे आमची मेबरशिपला अडथळा येईल यामुळे आम्हाला रस्त्यावर यावे लागेल.

मा.उप महापौर : सर्व सभासदांनी जागेवर बसून घ्या, सर्वांनी खाली बसुन घ्या.

(सर्वजन एकत्र येवून मोठमोठ्याने बोलतात. त्यामूळे कोणाचेही काहीही बोलणे ऐकू येत नाही. ५.०० मिनिटासाठी सभा तहकुब करण्यांत येते. वेळ १२.५५ नंतर १.०० वाजता सभा पुन्हा सुरू झाली.)

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : आपण जी मोहिम राबवित आहात आणि म्हणतात चला करा करा.

(सर्व जण एकत्र येऊन सभेत पुन्हा गोंधळ सुरू होतो काही एक ऐकू येत नाही.)

मा.उप महापौर : एका एका सभासदांनी बोलावे. दुसऱ्याने अशा वेळी बोलू नये आणि यापुढे डायससमोर स.सदस्य आल्यास सभासदत्व रद्द केले जाईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मी आपणांसमोर १५ वर्षापुर्वीच्या टपऱ्याची भूमिका आणू इच्छितो. पहिली गोष्ट अशी आहे की, १९९१ च्या पूर्वी ज्या टपऱ्या बसविल्या गेल्या. शहराच्या विकासाचे महत्वाचे कामे होणे गरजेचे होते. त्यावेळीचे श्री.गौतम, श्री.कोकाटे, श्री.मुजीबखान, कमिशनर यांच्या सर्वांचे मत असे होते की, जेवढे रस्त्यावरील अतिक्रमणे आहेत ती पाडली जावीत. मी सर्व स.सदस्यांना सांगतो की, शहराच्या विकासाचे काम आहे यासाठी आपण सर्वांनी मदत केली पाहिजे. त्यावेळी ज्या टपऱ्या डी.पी.रोडला दिल्या गेल्या होत्या त्या रोडची पुर्ण जागा सोडून बाजूला जी जागा होती त्या ठिकाणी हया दिल्या गेल्या होत्या. त्यावेळी मार्कींग करून सदरील लोकांना टपऱ्या दिल्या गेल्या होत्या. आमच्या स.कराड साहेबांनी ती कमिटी नेमली होती. क्रांतीचौक,उस्मानपुरा भागात बऱ्याच ठिकाणी टपऱ्या दिल्या २००१ पर्यन्त भाडे घेतले. २००२ पासून आपण भाडे घेणे बंद केले. आपण म्हणता की, मा.हायकोर्टाच्या निर्णयानुसार कार्यवाही चालू आहे,पण मा.हायकोर्टाचा निकाल असा आहे की, डी.पी.रोड जेवढा आहे त्यात जर टपरी येत असेल तर त्या ठिकाणचे अतिक्रमणे काढा, आपण त्या भागातील सर्वच टपऱ्या काढत आहात. आपण कायदा हातात घेत आहात पण असे होऊ नये की, जनता पण कायदा हातात घेईल. नागरिकांसाठी सहानुभूती दर्शविली पाहिजे अशी आमची इच्छा आहे. आपण कूठेही अतिक्रमणे काढत आहात, नोटीसा देवून कळवावे. आपण यावर निर्णय घ्यावा. ज्यांचेकडे परवानगी आहे, त्यांना ॲडजेस्ट करावे.

श्री नरवडे वसंत : औरंगाबाद शहराची लोकसंख्या वाढत गेलेली आहे. सुशिक्षित बेरोजगारांची संख्याही दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अतिक्रमण काढण्याची चांगली मोहिम आपण हाती घेतलेली आहे पण ही मोहिम हाती घेत असतांना याचे पर्यायी नियोजन तयार केले पाहिजे. अतिक्रमणे पाडत असतांना त्यांना कुठे पर्यायी जागा आहे. बाहेरून, परप्रांतीय आले आहेत. अशी कोठे तरी नियमावली तयार करा की, पैठण गेट पासून ते सिटीचौकापर्यंत कुठेही हात गाडी येणार नाही. ज्या ठिकाणी १०-१५ मिटरचा रोड आहे त्या ठिकाणी साईट रोडला त्यांना जागा द्या आणि त्यानंतर अतिक्रमणे पाडण्यास सुरूवात करावी त्यावेळी त्यांचे किती नुकसान होते याकडे लक्ष देऊ नये. शिस्त ही लागलीच पाहिजे. बेरोजगारांना संधी ही द्यावीच लागणार हे महानगरपालिकेचे काम आहे. हे अतिक्रमण एवढे का वाढले संबंधीत अधिकारी काय करतात, त्यांना याबाबत जबाबदार धरावे. ज्या रस्त्यावर गाड्या येऊ द्यायच्या नाहीत तो भाग घोषित करावा. आता पहिले त्या जनतेला पर्यायी जागेची व्यवस्था करूनच मगच अतिक्रमणे हटवावे अशी माझी सभागृहाला आणि स. सदस्यांना विनंती आहे.

श्री. कटकटे सतीष : पाच-सहा महिने झाले तेव्हा मा. आयुक्तांनी पाहणी केली होती की,रविवार आठवडे बाजाराच्या ठिकाणी जाफरगेट जवळ फारच अतिक्रमण झाले आहे.मी या संदर्भात १०-१२ पत्रे देखील दिलेली आहेत पण याबाबत काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा.

श्री. संतोष खेडके : मी सर्वात प्रथम मा. महापौर, मा. आयुक्त आणि मा. प्रशासनाचे अभिनंदन करतो की, शहरामध्ये जे अतिक्रमण काढल आणि पहिल्या वेळेस प्रशासनाने चांगले काम केलेले आहे. सभागृहात एक आवर्जुन सांगतो की, प्रशासनाने हे चांगले काम हाती घेतले असतांना काही  नगरसेवक का अडथळा करीत आहेत याची मला खंत आहे.

श्री.अब्दूल रशिद खान : अधिकाऱ्यांनी जे केले ते गैर कायदेशीर आहे. ज्या टपऱ्या महानगरपालिकेच्या कमिशनर ने दिल्या होत्या त्या आपण काढता आहात त्यास अभिनंदनाचे कारण नाही. आपण जनतेला बेरोजगार करत आहात. ६० फुटाचा रोड असेल तर तेथे ६० फुटाचाच करावा आपण त्या ठिकाणी ८० फुटाचा रोड करत आहात ज्या ठिकाणी ८० फुटाचा आहे, त्या ठिकाणी १०० फुटाचा करीत आहात हे चुकीचे आहे. मा. हायकोर्टाचा निर्णय तर हा निर्णय ४ वर्षापुर्वीचा आहे आता पर्यंत हे काम केले नाही. म.न.पा. समोरची बिल्डींग आहे मा. हायकोर्टाचा आदेश आहे. ५ मजली इमारत आहे. त्याबाबत काहीच कार्यवाही केलेली नाही.काहींनी घरे तोडून आता पुन्हा पुढे दुकाने सरकसवली आहे ती काढावीत. पैठणगेट ते औरंगपुरा सर्वच दुकाना पुढे आलेल्या आहेत र्त्या का हाटवत नाही. हा कुठला न्याय आहे. गरीब बेरोजगार होत आहेत आणि आपण सत्कार करीत आहात.

सौ. लता दलाल : अतिक्रमणाचा मुद्दा या ठिकाणी चर्चेला जात आहे. या बद्दल आम्ही मा. महापौरांचे आणि मा. आयुक्तांचे अभिनंदन ही केलेले आहेत. महत्वाचा मुद्दा असा आहे की, हे शहर जागतिक पर्यटन नकाशावर एक प्रमुख शहर आहे. आता जर या शहराची अतिक्रमणामुळे परिस्थिती बघितली तर अतिशय बकाल अशी दिसत आहे. अतिक्रमण काढण्याचा जो निर्णय घेतलेला आहे तो अतिशय बरोबर आहे. आपण जो रस्ता वाढवुन घेतो त्याबद्दल मावेजा देतो काही दिवसानंतर पुन्हा तेथे अतिक्रमण होते ते अतिक्रमण काढलेच पाहिजे. दुसरी अशी गोष्ट अशी आहे की, सन १९९६ जी कमिटी नेमली होती त्याचे अध्यक्ष मुश्ताक अहमद हे होते त्यावेही जो अहवाल आला होता त्यात असे नमुद केले होते की. किती टपऱ्या चालू आहेत की ज्या अतिक्रमित आहे. किती बंद आहे, किती चालू आहेत, किती टपऱ्याचे भाडे येते, किती टपऱ्याचे भाडे येत नाही आणि या नंतर हा ठराव सभागृहात चर्चेला गेला होता. त्यावेळी असा ठराव झाला होता की, प्रशासनाने ज्या ज्या ठिकाणी टपऱ्या देता येतील त्या त्या ठिकाणी देऊन भाडे घ्यावे असा प्रस्ताव झाला होता. त्यानंतर त्यावेळी असा ही प्रस्ताव झाला होता की, ज्या ज्या टपऱ्या अतिक्रमित आहेत त्या त्या काढण्यात याव्यात. आपल शहर सुंदर करण आवश्यक आहे. तरच या ठिकाणी पर्यटक येतील आणि या ठिकाणी सुधारणा होईल. यासाठी सर्वच नगर सेवकांनी शहर सौंदर्यीकरण करण्यासाठी प्रयत्न करावे अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

श्रीमती.अजरा जबीन : आपल्या समोर अतिक्रमण हटवायचे आहे किंवा नाही असा प्रश्न आहे. याठिकाणी शहराच्या बाहेरचे जे रस्ते आहे तेच मोठे असून चालणार नाही तर शहरातील रस्ते मोठे असणे सुध्दा आवश्यक आहे कारण पर्यटन ठिकाण आहे. रस्ते साफ पाहिजेत. आपण ज्या टपऱ्या हाटवित आहात. त्या कोणत्या हाटवित आहात.आपण ज्यांना हाटवित आहोत त्यांना पहिले पर्यायी जागेची व्यवस्था करावी नंतरच त्यांना हाटवावे. त्यांना आठ दिवसापूर्वीच नोटीस देणे आवश्यक आहे की आपले सामान येथून हालवावे. नंतरच ही कार्यवाही करावी असे आमचे सर्वांचे म्हणणे आहे.

श्री. सलीम पटेल : अतिक्रमण हटविण्याच्या कामासाठी स. सदस्यांनी आपले अभिनंदन केले त्याला आमचा विरोध आहे. आपण आम्हा ४ नगरसेवकांना नोटीस दिल्या आहेत. महानगरपालिकेचे अनेक अधिकारी आहेत रस्त्यात अतिक्रमणे केली आहे त्याच काय ? त्यांना निलंबीत केले पाहिजे, सेवेतून काढून टाकले पाहीजे. त्यांचे घरे देखील तोडली पाहिजे, याचा खुलासा करावा.

श्री. ठाकुर पुरूषोत्तम : मा. महापौर आणि मा. आयुक्त यांनी अतिक्रमणविरूद्ध चांगले पाऊल उचललेले आहे ही चांगली गोष्ट आहे पण आपल्याकडे जो अतिक्रमण हटाव पथक आहे तो काय काम करतो. जेथे जेथे महानगरपालिकेची ओपन स्पेस आहे त्या त्या ठिकाणी देखील अतिक्रमणे झालेली आहेत. आपण नगरसेवकांनी पाठवलेल्या लेटरपॅडला देखील महत्व देत नाही कारण मी निवडूण आल्यावर कळविले होते की, माझ्या वार्डात महानगरपालिकेची किती ओपनस्पेस आहे, किती जागा अतिक्रमित आहे, किती कोर्ट मॅटर चालू आहे,नंतर मी माहिती अधिकाराखाली अर्ज केला तरी देखील मला माहिती देण्यात आली नाही त्यानंतर मी सेकंड अपील केले आहे. आता जर मला माहिती मिळाली नाही तर मी आता मुंबईला अपील करणार आहे. मा. आयुक्त साहेब मला याबद्दल संपूर्ण माहिती पाहिजे की, माझ्या वार्डात किती ओपनस्पेस आहे, किती कोर्ट मॅटर चालू आहे, किती ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत, याबद्दल एका महिन्याच्या आत माहिती मिळावी अन्यथा नाईलाजास्तव मला मुंबईला अपील करावी लागेल. त्याच्या होणाऱ्या परिणामास आपण स्वत: जबाबदार असाल याची नोंद घ्यावी.

श्री. हिम्मतराव दाभाडे : आता पर्यंत हा गोंधळ चालु आहे की, अतिक्रमण झालेले आहे कोणी म्हणत तोडावे कोणी म्हणत तोडू नये, अतिक्रमण झाले कसे, कोणी केल, अतिक्रमण हटाव मोहिम सुरू आहे. असे मी तीन-चार दिवसापासून ऐकतो आहे. अतिक्रमण विभागाचे निकम साहेब मी यांना वेळोवेळी सांगितलेले आहे की महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. त्यांनी आतापर्यंत हे अतिक्रमण हटविलेले नाही. त्याकडे दुर्लक्ष केले आहे. उस्मानपुरा पोलिस स्टेशनच्या बाजुला एका रसवंतीला जागा देण्यात आलेली आहे. त्या व्यक्तीचे नाव भगवान निकाळजे आहे नोंद करून घ्या. सिजन संपलेला आहे तरी देखील ती जागा खाली करण्यात आलेली नाही. तुमचे अतिक्रमण हटाव अधिकारी तेथे जातात पुन्हा येतात त्यांना काय देत असेल काय घेत असेल,याबद्दल मला बोलायचे नाही.उस्मानपुरा भागातील एका माजी उपमहापौर यांनी त्या ठिकाणी १००× २०० चे शेड टाकलेले आहे. त्या ठिकाणचे अतिक्रमण त्यांना दिसत नाही का ? सद्या पावसाळ्याचे दिवस चालू आहे काही लोकांना आपण बेघर केले आहे. काही लोकांना बेटपऱ्या केले आहे. रोडवर टपऱ्या देण्याची परवानगी कोणी दिली कोणता अधिकारी आहे त्याची चौकशी व्हावी निकम यांचीही या ठिकाणी चौकशी व्हावी अशी मी मा. सभागृहास विनंती करत आहे.

श्री. मुजीब खान : आपण अतिक्रमण हटाव मोहिमेअंतर्गत अतिक्रमणे पाडत आहात. ज्या लोकांना आपण टपऱ्या दिल्या होत्या त्या देखील आपण काढत आहात. लोकांना बेघर करत आहात. या गरीब जनतेला आपण ३५-४० हजार रूपयाला एक टपरी दिली एवढा पैसा त्यांनी आणायचा कोठून, गरीब जनता दोन वेळच्या जेवणासाठी त्रस्त असतात आणि त्यांच्याच टपऱ्या आपण पाडत आहात. सिध्दार्थ गार्डन जवळ देखील अशाच प्रकारचे अतिक्रमणे काढली आहेत. मोठमोठ्या बिल्डर्सच्या जागी

खाली करीत नाहीत.याचा पुर्ण सर्व्हे केला पाहिजे आणि या सभागृहात मांडला पाहिजे.

श्री. गायकवाड कैलास : आपली अतिक्रमण हटाव मोहिम आठ दिवसापासून चांगलीच चालली आहे, अधिकारी वर्गाचे मी अभिनंदनच करतो. मागे दोन वर्षापूर्वी मा. हायकोर्टाच्या आदेशानुसार पार्किंगच्या जागा खाली कररावयाच्या आहेत. त्यासंदर्भात मी. मा. आयुक्तांना आता पर्यंत ४ पत्रे दिली आहेत. पण आता पर्यंत त्यांनी त्यावर काहीही निर्णय घेतलेला नाही. आता पुन्हा मी या सभागृहात विनंती करतो की, पार्कींग संदर्भात मा.आयुक्तांनी या ठिकाणी खुलासा करावा.

श्री. विसपुते शशांक : आता जी अतिक्रमण हटाव मोहिम चालू आहे. त्या बद्दल मा.महापौर मा.आयुक्त, उपआयुक्त यांचे अभिनंदन करण्यात येते. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आपण जे अतिक्रमण काढता आहात ते अतिक्रमण काढल्या नंतर तेथे टेम्पररी हातगाड्या उभ्या राहतात त्याचे रूपांतर पुन्हा टपऱ्यात होते हे पुन्हा घडू नये यासाठी काळजी घेतली पाहिजे. अतिक्रमण पून्हा होऊ नये यासाठी संबंधीत अधिकाऱ्याकडे याची जबाबदारी सोपवली पाहिजे. दुसरी गोष्ट अशी आहे की, मुख्य रस्त्यावरचे आपण अतिक्रमण काढत आहात त्याचबरोबर अंतर्गत रस्ते, ओपनस्पेस, नाले या ठिकाणचेही अतिक्रमण काढण्यात यावे. ही योजना पुन्हा सतत चालू राहण्यासाठी काहीतरी उपाय योजना करावी ही आपणाला विनंती आहे.

श्री. कावडे साहेबराव : अतिक्रमणावर आपला विषय चालु आहे त्याबाबत बऱ्याच नगरसेवकांनी आपले स्वागत देखील केले. या शहरामध्ये आपले युतीचे महापौर आहे. अतिक्रमण हे केवळ टपऱ्याचे नाही. रहदारीमुळे टपऱ्याची अडचण आहे.बरेचशे लोक हे गोलमोल गोष्टी करतात कारण की त्यांना रोज गल्ली जावे लागते पण ते विचार करीत नाही की, यामुळे महानगरपालिकेच्या जनतेचे नुकसान होत आहे.सध्या जलवाहिनीवर अतिक्रमण केलेले आहे, मोठमोठ्या नळाच्या पाईपलाईनवर अतिक्रमण केलेले आहे याकडे कोणाचेही लक्ष नाही. आयुक्त याकडे लक्ष करीत नाही, कर्मचारी त्याकडे लक्ष देत नाहीत. अतिक्रमण काढीत असतांना सर्वसामान्य जनतेचा पैसा खर्च होत आहे याचा विचार केला जात नाही, आर्थिक नुकसान हे सर्वसामान्य जनतेचे होत आहे. फक्त अतिक्रमण काढत असताना कॅमेऱ्यात आलो पाहिजे नुकसान कोणाचे होत आहे याकडे कोणाचेही लक्ष नाही. हे जर चुकीचे वाटत असेल तर सर्व्हे करा, अनधिकृत कनेक्शन किती आहेत ते पाहावे. अतिक्रमण काढले म्हणजे मोठे काम केले असे नाही. या मागील बाकीच्या कृतीचा देखील विचार करावा.

श्री. सलीम खान : अतिक्रमण काढत आहात ही फार मोठी चांगली गोष्ट आहे. औरंगाबाद शहराला सुंदर बनविण्याचा विचार आहे ही गोष्ट चांगली आहे. पण याचा विचार केला पाहिजे की, आपला रोड किती फुटाचा आहे. त्याच्या विचार करून अतिक्रमण काढण्यात यावे ज्या टपरी धारकाला परवानगी दिलेली आहे त्यांना आपण विनाकारण त्रास देऊ नये. ते टपरीधारक बँकेकडून कर्ज काढतात, कोणाकडून पैसे आणतात, कोणी व्याजाने पैसे काढतात जर आपण जी टपरी पाडली तर त्यांनी ते पैसे कोठून आणायचे. मी अतिक्रमण काढत असताना आलो त्यामुळे मला नोटीस देण्यात आली याच मला दु:ख नाही. पण मी काय म्हणालो होतो याचा विचार करायला पाहिजे. गरीब जनतेची आर्थिक हानी होऊ नये मला नगरसेवक पद आजही गेले तरी दु:ख नाही. मा. न्यायालयाची स्थगिती असताना तोडफोड केली. या भागात निवडणूकीची आचारसंहिता कधी लागलेली आहे. त्यात काम करता येते का?

करता येत असेल तर ठिक आहे. गरीब जनतेला आपण जी आश्वासने दिली आहेत त्यांना पर्यायी जागा अजुन उपलब्ध केलेली नाही. सदरीत जनतेने काय केले पाहिजे त्यांच्यावर कर्जे आहेत. अतिक्रमण हटविण्यास माझा विरोध नाही.

सौ.रहाटकर विजया : आपण आताच नागपूरला भेट देऊन आला आहात. त्यामुळे आमच्या अपेक्षा उंचावल्या आहेत कारण नागपूर शहर हे सुंदर आहे. मग आपल्या शहराचं काय फक्त पदाधिकारी आणि आयुक्त सुंदर शहरच बघून येणार काय आमच शहर सुंदर करणार याबद्दल अपेक्षा आहे. आपण शहर सुंदर करण्याच्या दृष्टीने एक चांगल पाऊल उचललेले आहे. ते पाऊल ठाम राहिले पाहिजे नाहीतर दोन-चार दिवस करणार व नंतर पुन्हा बंद असे होऊ नये .चालु असलेली योजना बेमुदत चालू राहिली पाहिजे याची काळजी प्रशासनाने घेतली पाहिजे. हे काम करत असतांना आपल्या पाठीमागे सर्व स.सदस्य उभे आहेत. हे शहर सुंद करण्याच्यादृष्टीने चांगले प्रयत्न चालू आहे. महानगरपालिकेतर्फे न्यायालयात जाण्यासाठी नोटीस देतात व त्यांना वेळही दिला जातो. कोर्टकेस होते मग महानगरपालिका लढू शकत नाही मग आमच्या हातात काही नाही,असे म्हणुन हे अधिकारी पुढे चालत आहेत. चांगल्या चांगल्या जागा अतिक्रमणात गेल्या आहेत ही आमची शोकांतिका आहे. याकडे मा.आयुक्तांनी आपल्या अधिकारी वर्गाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. प्रत्येकवेळी नगरसेवकांची ओरड होते. अतिक्रमण काढून शहर स्वच्छ करा पण यानंतर पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची काळजी घ्या. एकदिवस आपलं शहर हे नागपूरहुन सुंदर दिसेल याचा आम्हाला अभिमान आहे. पर्यटनस्थळ आहे.

श्रीमती मेहेरून्नीसा खान : मी महानगरपालिकेला पत्र पाटविले होते की, महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण होत आहे असे सांगूनही तेथील अतिक्रमण हटविल्या जात नाही. का हटविले जात नाही. पाण्याच्या लाईनवर टपरी आहे ती काढण्यासाठी श्री. निकम, श्री. जरारे इ. यांना पत्र दिले तरी देखील ती काढण्यात आली नाही, का ? महानगरपालिकेच्या जागेवर सद्या बिल्डींग उभ्या होत आहे त्याकडे लक्ष नाही. केवळ गरिबांना बेरोजगार करण्याचा प्रयत्न चालू आहे. महानगरपालिकेच्या जागेवरचे अतिक्रमण का काढले जात नाही याचा खुलासा करावा.

श्री. सय्यद खुसरो : औरंगाबाद शहराकडे मा. महापौर साहेब, मा. कमिशनर साहेब लक्ष द्या मुद्याची गोष्ट आहे, औरंगाबाद शहर सुंदर करण्याची मोहिम आपण हाती घेतली आहे पण आपण साफसफाईकडे लक्ष देत नाही. शहरात सद्या चिकन गुनियाची साथ चालु आहे. याकडे आपले लक्ष नाही.केवळ टपऱ्या काढा याकडे आपले लक्ष लागलेले आहे. औरंगाबाद शहरामध्ये मोठमोठे अपार्टमेंट बांधले जात आहेत त्याची पार्किंगची जागा कुठे आहे याकडे आपले लक्ष नाही. एक तासापासून ऐकत आहे सभागृहाचा वेळ फुकट घालत आहेत. निराला बाजारामध्ये मोठमोठे शॉपींग कॉम्पलेक्स बनत आहेत त्यांची किंमत ४० लाखरूपये त्यांची पार्किंगची जागा कोठे आहे. आपण अतिक्रतण हटवित आहात याला माझा विरोध नाही पण या मोठ्या लोकांसाठी कानुन- कायदा आपल्याकडे नाही काय ? सालभरापासून रोगाची लागण चालु आहे यावर आपल लक्ष नाही. साफसफाईकडे जरा लक्ष दिले जावे कारण सद्या चिकन गुनियाची चांगलीच साथ चालु आहे. नागरिक आम्हाला बसू देत नाही. याकडे जरा लक्ष द्यावे.

श्री. सलीम पटेल : माझ्या वार्डात मागच्या दोन महिन्यापूर्वी चिकन गुनिया संदर्भात महापालिकेच्या वतीने दोन रक्ताचे नमुने घेण्यात आले होते. दोन महिने झाले असून देखील त्यावर कुठलीही कार्यवाही आजपर्यंत झालेली नाही.

श्री. कचरू मोरे : औरंगाबाद शहराला इतिहासीक वारसा आहे. हा जो वारसा आहे. त्यासाठी मा. आयुक्त आणि मा. महापौर यांनी चालू केलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेचे खरोखर स्वागतच केले पाहिजे. औरंगाबाद शहर जगाच्या नकाशावर स्वच्छ शहर म्हणून आहे. पण हे सर्व करत असताना प्रशासनाने ज्या टपऱ्यांना यापुर्वी परवानगी दिली होती त्याचे पुनर्वसन करणे हे प्रशासनाचे काम आहे. मी सभागृहाला विनंती करेल आपल्या वार्डमिध्ये कुठे कुठे दुकाने तयार करता येईल हे सांगावे. माझ्या वार्डामध्ये वेदांतनगर ते पीरबाजार मोठा रस्ता आहे. प्रशासनाने त्या ठिकाणी १८ गाळे बांधलेले आहेत. आणखी बांधता येईल का ते बघावे. टपरी धारकांना हे अशी प्रशासनाला विनंती आहे. या भागामध्ये एका महाशयाने महानगरपालिकेच्या जागेवर कुंपन घालून जागा बळकावलेली आहे. अतिक्रमण हटाव विभागाचे अधिकारी श्री. निकम यांनी सांगितले. श्री. निकम हे आमच्या उपस्थितीत त्यांच्याकडे गेले ते श्री. निकम यांचे मित्र होते तेथुन परत आले असे जर काम करीत असेल तर अतिक्रमण कसे हटेल. प्रशासनाला नम्र विनंती करतो, या ठिकाणी जर काही गाळे बांधुन देता येत असतील तर बेरोजगारांना मदत करावी. दुसरी एक सुचना अशी आहे की, वेगवेगळया वॉर्डमध्ये ज्या ओपनस्पेस आहेत त्या ठिकाणी व्यापारी संकुल बांधुन टपरी धारकांना ती देण्यात यावी अशी मा.प्रशासनाला विनंती आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : गेल्या दोन-तीन तासापासून अतिक्रमणाविषयीच्या ज्या भावना आहेत त्या आपण ऐकल्या. परंतु या ठिकाणी असे चित्र उभे करण्यात येत आहे की, नगरसेवक हे अतिक्रमणाच्या विरूद्ध आहेत. नगरसेवक हे अतिक्रमण काढण्याच्या बाजुने आहेत.पण अतिक्रमण आहे की, नाही अतिक्रमणासाठी आपण परवानगी दिली होती का ? महानगरपालिकेच्या जागेवर कोणाचे अतिक्रमण आहे याची आपण चौकशी केली आहे का ? जर महानगरपालिकेच्या जागेवर, कोणाचेही अतिक्रमण असो ते अतिक्रमण काढण्यासाठी सर्व नगरसेवक आपल्या बरोबर आहे. महत्वाची गोष्ट अशी की, पावसाळा चालू झालेला आहे आणि आपण अतिक्रमणाची मोहीम हाती घेतलेली आहे. अतिक्रमण हे पावसाळा हिवाळा यामध्ये न करता सर्व सभागृहाच्या वतीने आपल्याला विनंती करतो की, आपण ज्या ठिकाणी अतिक्रमण काढायला जाणार आहात त्या ठिकाणच्या टपऱ्या आपण दिलेल्या आहेत का याची चौकशी करून घ्यावी. दिलेल्या आहेत तर कोणाला दिलेल्या आहेत याची चौकशी व्हावी. ते अतिक्रमण आहे का याची चौकशी व्हावी.दुसरी गोष्ट अशी की, आमचे जे नगरसेवक आहेत हे सर्वसामान्य वॉर्डातधून निवडून आलेले आहेत त्यामुळे नगरसेवकांनी काही विनंती केली आहे ती अतिक्रमण काढू नये यासाठी नाही तर त्याठिकाणी आपण ज्या टपऱ्या दिलेल्या आहेत की, ज्या लिगल आहेत त्यांना आपण पर्यायी जागेची व्यवस्था करून मगच त्या काढाव्यात म्हणजे त्यांच्यावर अन्याय होणार नाही. यासाठी आपणाकडे विनंती केली आहे. मोठया रोडच्या बाजुला जर मोकळी जागा असेल तर त्याठिकाणी महानगरपालिकेने त्या ठिकाणी प्लॅन तयार करावे त्यांची व्यवस्था करावी. हॉकर झोन काढण्यात यावे. महानगरपालिकेची जागा आहे कस पाहावे नसता संपादन करुन देता येते का तेही तपासावे. दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, पार्कींग. महानगरपालिकेची जर जागा असेल तर त्या ठिकाणी कोणाला तरी कॉन्ट्रॅक्ट देऊन पार्किंगची व्यवस्था करावी. त्यातून महानगरपालिकेला पैसा मिळेल आणि महानगरपालिकेच्या ताब्यात जागा राहिल अशी व्यवस्था आपण करू शकता. दुसरी एक विनंती मी आपल्या

समोर करणार आहे नागपूरपेक्षाही आमचं शहर हे सुंदर व्हाव ही आमची सर्वांची इच्छा आहे. आपण नागपूरला गेलात इतर कुठेही गेलात त्यापेक्षा आमचं शहर सुंदर व्हाव अशीच आमची ईच्छा आहे. कोणताही नगरसेवक आड येणार नाही व सर्व मदत करणारे आहेत.पण एकच विनंती करणार आहेत की, अतिक्रमण काढत असतांना सर्वप्रथम व्यावसायिकांचा विचार करावा. मनपाच्या जागेचा विचार करावा आणि शेवटी मी आपणास विनंती करतो की, पावसाळयाच्या दिवसात ह्या मोहिमेला आठ दिवस स्थगिती देऊन विचार करू न अभ्यास करुन नंतरच ही मोहिम राबवावी अशी आपणांस विनंती आहे.

श्री. बारवाल गजानन : काही जर झाले तरी डी. पी. रोडवर जी अतिक्रमणे झाली आहेत त्यांना पर्यायी जागा द्या. जागा असेल तर कॉम्पलेक्स बांधुन द्या असे त्यांचे स्पष्ट मत आहे, पण माझे असे मत आहे की, भविष्य काळाच्या दृष्टीने त्यांना तेथे ठेवणे व पर्यायी जागा देणे हे योग्य वाटत नाही.ज्या महापालिकेच्या जागा असतील त्या ठिकाणी निश्चितपणे टपरी मार्केट तयार करून द्या. परंतु पुन्हा पुन्हा टपऱ्याधारकांना पर्यायी जागा देणे हे योग्य नाही असे माझे मत आहे. ते म्हणतात की, महानगरपालिकेने त्यांना परवानग्या दिल्या होत्या पण त्या काही मर्यादीत काळसाठी दिल्या होत्या. त्यावेळीच्या धोरणात आणि या वेळच्या धोरणात फार फरक झालेला आहे. त्यामुळे भविष्य दृष्टीने कोठेही टपऱ्या ठेवू नयेत त्यांना पर्यायी जागा देखील देऊ नये कुठल्याही परिस्थितीत अतिक्रमण हटाव मोहिम थांबविण्यात येऊ नये अशी माझी विनंती आहे.

सौ. मंगला गायकवाड : मा.महापौर साहेब, क्रांतीनगर रोडवरील अतिक्रमण हाटविण्यात आले आहे त्यांना पर्यायी जागा मिळणार आहे किंवा नाही याचा खुलासा करण्यांत यावा.

मा.उप महापौर : गेल्या दोन-अडीच तासापासून या विषयावर चर्चा झालेली आहे जवळपास सर्वच स. सदस्यांनी उत्स्फुर्तपणे पाठींबा दिलेला आहे कोणीही विरोध दर्शविलेला नाही. शहर सुंदर करण्याकरिता, स्वच्छ करण्याकरिता, सर्वांनी अभिनंदन देखील केलेले आहे.त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो, ज्यांचा विरोध असेल त्यांचा विरोध नोंदवून घेऊ. ज्यांनी अतिक्रमण काढण्यास पाठींबा दिला त्यांच्याबद्दल आपण बोलू. जे शहर चांगले करण्याकरिता पाठींबा देत आहेत, शासन आणि प्रशासन मिळून एक चांगल्या कामाला सुरूवात झाली आहे यापुढेही आपल्याला चांगली कामे करावयाची आहेत. त्या प्रकारचे मुद्दे येथे चर्चेला आले जनतेला कुठल्याही प्रकारचा त्रास न होता त्यांच्या टपऱ्यांचे नुकसान न होऊ देता काढण्यात येईल. ज्यांनी स्वत: हुन अतिक्रमणे केलेली आहेत त्यांनी स्वत: ती काढून घ्यावीत जेणे करून त्यांचे नुकसान होणार नाही. कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्व भागामध्ये अतिक्रमण काढण्याची ही मोहिम चालू ठेवावी असे ती आदेशित करतो.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : यास आमचा निषेध नोंदवावा.

(यावेळी सर्व स.सदस्य एकत्र डायससमोर येऊन गोंधळ करतात. घोषणा देतात. कोणाचेही काहीही व्यवस्थित ऐकु येत नाही.)

मा.उप महापौर : सर्व स.सदस्यांनी जागेवर बसा विषय पत्रिका घेण्यात येत आहे. विषय क्र. १

श्री.कोकाटे काशिनाथ : गेल्या सर्व साधारण सभेमध्ये १० लाख रूपयांचे कामे करण्याचे आश्वासन या सर्वसाधारण सभेमध्ये देण्यात आले होते. परंतु अद्याप त्याच्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. त्यामध्ये २००५-२००६ मध्ये जे स्पील ओव्हरमध्ये कामे केले होते ते कामे अद्याप पर्यंत करण्यात आलेले नाहीत. २००६-२००७ चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. परंतु अर्थसंकल्पाची कामे ज्या गतीने

करावयास हवी होती त्या गतीने जाणीवपुर्वक केलेली नाहीत. सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय झाला की, १५ दिवसामध्ये निविदा काढण्यात येतील आज एक महिना झाला, आतपर्यंत निविदा निघालेली नाही ती का निघाली नाही याचा खुलासा झाल्याशिवाय पुढील कामकाज होऊ नये अशी विनंती आहे.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : मी मागच्या वेळेस सुध्दा सांगितले होते आणि आता ही सांगतो नगरसेवक हे नोकर नाहीत. अधिकारी हे पगार घेतात. दुसरी गोष्ट अशी की, आम्ही वर्षभरापासून सांगातो की, अधिकाऱ्यांना बंधने घालावे नगरसेवकांनी सांगितलेली कामे किंवा पदाधिकाऱ्यांनी सांगितलेली कामे होण्यास काही अडचणी असतील तर त्यांनी त्या सांगाव्या. दुसरी गोष्ट अशी की, सर्व अधिकाऱ्यांच्या एजन्सीनज बंद करा. जो पर्यंत एजन्सीज बंद करीत नाही तो पर्यंत महानगरपालिकेची कामे व्यवस्थित होत नाही. तर तुम्ही अधिकाऱ्यावर कंट्रोल करा नंतर तुम्ही अतिक्रमणाच्या मागे पाठीमागे लागा अशी आपणाला विनंती आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : सन २००५-२००६ च्या स्पील ओव्हर च्या कामाची स्थिती काय आहे याचा अगोदर खुलासा करा. आणि नंतर सन २००६-२००७ चा खुलासा करा. सन २००५-२००६ चे कामे तरी पूर्ण करण्यात आलेली आहेत का ? मी आपणासमोर आणु इच्छितो की, २५% कामे अशी आहेत की, जी स्पील ओव्हरमध्ये चालू आहेत. किती दिवस चालणार आहेत या कामांना टाईम लिमीट दिलेले आहेत का? ६ महिन्याच्या कालावधीत ही कामे करायची आहेत. वॉटर सप्लायचे एकही काम अद्याप झालेले नाही. पाईप आलेले आहेत. वॉटर सप्लायचे काम करण्याची आवश्यकता नाही का? आम्ही अतिशय जबाबदारीने वक्तव्य करीत आहोत. आम्ही शहराचा दोन वर्षाचा अभ्यास करून हे बोलत आहोत आम्ही येथे आरोप किंवा प्रत्यारोप करत नाही. हे आम्ही मा.आयुक्तांच्या लक्षात आणून देण्यासाठी बोलत आहोत. मा.आयुक्तांनी जर आम्हाला दाखवुन दिले की, आमचे अधिकारीच बरोबर कामे करत आहेत, तर आम्हाला त्यात काहीही वाईट वाटणार नाही. हे कामे करण्याचे ठरविले आहे किंवा नाही हे या सभागृहाला कळणे आवश्यक आहे. पुन्हा एकदा आपल्या निदर्शनास आणुन देतो की, ३०/८ पुर्वी झालेल्या अंदाजपत्रकाचे अद्याप पर्यंत निविदा आलेल्या नाहीत ही देखील बाब आपल्या निदर्शनास आणुन देतो.

श्री. संजय जोशी : स.श्री.कोकाटे साहेब म्हणाले त्या प्रमाणे बऱ्याच ठिकाणी निविदाच निघालेल्या नाहीत. बऱ्याच निविदापण निघालेल्या आहेत. अमरप्रीत ते बीड बासपास टेंडर ६.५० निघाले याचे कामे ते सभागृहातच मंजुर केल होत एवढ्या लवकर तो निर्णय झाला पण अजुन त्या कामाची सुरूवात देखील झालेली नाही. १ वर्षे झाले २% रक्कम भरलेली आहे. त्याला वर्क ऑर्डर देखील मिळाली आहे. अद्याप ते काम चालू झालेले नाही. काय अडचण आली आहे याचा खुलासा करावा.

श्री. महेश माळवतकर : मा.आयुक्तांनी गेल्या वेळेस १० लाखाच्या कामाचे टेंडर तातडीने काढू असे म्हणाले होते तर ते याच वर्षी काढणार आहात किंवा नाही एवढे तर सांगा त्याचे इस्टीमेट देखील तयार झाले. आपण सांगितल्याप्रमाणे हेड टाकून घेतले ते हेड टेंडर पर्यंत पोहचायला का वेळ लागतो याचा खुलासा करावा. बाकीचे इस्टीमेट आपण या वर्षी करणार आहात की, पुढच्या वर्षी करणार आहात हे ही सांगा.

मा. ठाकुर पुरूषोत्तम : मा.कमिशनर साहेब, आपण जे कामे करत असता ही कामे करून घेण्याची जिम्मेदारी नगरसेवकांची असते की, अधिकाऱ्यांची असते याचा खुलासा करावा. जे नगरसेवक येथे निवडून आलेले आहेत त्यांची सर्वांची इच्छा असते की, आपला

वार्ड सुव्यवस्थित असावा. आपल्याला जनतेने येथे लोकप्रतिनिधी म्हणून पाठवले आहे येथे आपण कामे करण्यासाठी आलेलो आहोत. पिकनिकला आलेलो नाही. नागरीक बोलतात की, तेथे जावून आपण काय करता ? कामे करून घेण्याची जिम्मेदारी अधिकाऱ्यांची आहे की नगरसेवकांची याचा खुलासा द्यावा.

शहर अभियंता : सन २००६-२००७ च्या बजेट मध्ये जे कामे आलेले आहेत त्याचे अंदाजपत्रक आपण सुरू केलेले आहेत. बरेचशा कामाचे इस्टीमेट देखील तयार झालेले आहेत आणि दहा लाखाचे जे काम सिडकोमधील करावयाचे होते. त्याचे अंदाजपत्रक तयार केले होते. त्यात बऱ्याच नगरसेवकांची ही कामे अर्थसंकल्पात आहेत.

श्री. महेश माळवतकर : हे इतर किती वेळा सांगत आहात हे मागच्या वेळेस मंजुर केले आहेत. आता आम्ही जे हेड दिले ते हेडला केव्हा येणार आणि टेंडरला केव्हा येणार हे सांगा.

शहर अभियंता : बाकीचे जे काही कामे राहिलेली आहेत त्याचे अंदाजपत्रक तयार करून त्याच्या टेंडर नोटीस काढतो.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ : कामे का होत नाही. कामे होत नसतील तर या अधिकाऱ्यांवर बंधने घालावीत काम होत नसेल तर परत पाठवा.

श्री. कोकाटे काशिनाथ : कुठलेच कामे का होत नाही, इस्टीमेट इस्टीमेट म्हणता, संगणक युगात कुठल इस्टीमेट इस्टीमेट म्हणता काम करायला काही वेळ लागत नाही. आपण ते कामे करत नाहीत.सन २००४-२००५ चे स्पील ओव्हरमधील कामे देखील होत का नाही. त्यानंतर सन २००५-२००६ चे काम कधी होणार आहेत. याचा खुलासा करा.लोकप्रकतनीधीनेच यांना विचारायला हवे आहे का ? लोकप्रतिनीधीनेच कामे करून घेतली पाहिजे का ? अधिकारी वर्ग लोकप्रतिनीधींनी सांगितल्याशिवाय कामे का करत नाही ?

श्री. संजय जोशी
सौ. रजनी जोशी : महापौर साहेब सर्व अधिकारी बेफिकर आहेत. सर्व कामे मंदगतीने चालू आहेत. सर्व कामाचा खुलासा करावा.

श्री. कोकाटे काशिनाथ : सर्वसाधारण सभेत प्रस्ताव होतात आणि त्याची पुढील काहीही कामे होत नाही, का होत नाही, आम्ही हे अजिबात खपवुन घेणार नाही. अगोदर याचा खुलासा करावा. सन २००४-२००५ ची बरीच कामे बाकी आहे ती कोणती बाकी आहेत? व किती बाकी आहेत याचा खुलासा करावा.

श्री.माळवतकर महेश : कामे कस्न घेण्यासाठी आम्ही कोणत्या अधिकाऱ्याला भेटावे हे तरी सांगा.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : बजेट नाही तर कामे कसे सुरू करता ? पहिले बजेट बुक द्या पहिल्यांना आम्हाला समजु द्या काय काय कामे आलेले आहेत.

श्री. मोरे कचरू : आयुक्त साहेब, अधिकाऱ्यांना जरा कामाची गती वाढविण्यास सांगा.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : मार्चमध्ये बजेट मंजुर झाले,एप्रिल,मे,जून,जुलै उजेडायला आला अजुन बजेट बुक मिळत नाही. आम्ही काय सांगासचे नागरिकांना आम्ही काय काय कामे मंजुर केले.

सौ. रजनी जोशी : सिडकोतील कामाचे काय ? खुलासा अगोदर करा.

श्री. कोकाटे काशिनाथ : मा.महापौर साहेब, सन २००४-२००५ मधील स्पील ओव्हरमधील कामे का होत नाही याचा खुलासा करा. नंतर २००५-२००६ मधील कामाचा खुलासा करा. कामे का होत नाही काय अडचण आहे हे तरी आम्हाला सांगा.

श्री. हिम्मतराव दाभाडे : गेल्या सन २००५-२००६ चे जे जे इस्टीमेट तयार झालेले आहेत. त्यावेळी ठेकेदाराला काही कामे दिलेली आहेत. माझ्या वार्डात फारूकी नावाच्या व्यक्तीने काम घेतलेले आहे. तीन महिने झालेले आहेत त्याने फक्त दोन रोड बनविलिले आहेत. अशा निष्काळजीपणाने जर अधिकारी आणि ठेकेदार कामे करत असतील

तर, कामे कधी होणार बजेटचे मार्च महिना आल्यानंतर कामे लवकर लवकर करून घ्या असे झाल्यावर त्या नगरसेवकाने कशी कामे करून घ्यावीत याचा खुलासा येथे करावा. अशा प्रकारे ठेकेदार जर निष्काळजीपणाने कामे करीत असेल आणि टाईम लिमीट जर संपला असेल तर त्यांना निश्चितच शिक्षा करा अशी माझी इच्छा आहे.

श्री. महेश माळवतकर : जसे १० लाखाचे कामे त्याशिवाय प्रभागाची कामे सुचविली. स्थायी समितीने सिडकोसाठी कामे सुचविले त्याच्या इस्टिमेंटला उशिर होण्याचे कारण काय? एकाही डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्यांनी आतापर्यंत आम्हाला विचारलेले नाही की, तुमच्या वार्डातील कामे काय आहेत, आम्हीच त्यांना विचारायचे तुम्ही कधी येणार ह्याची सुरूवात करायची का ? जर सिडकोचे काम होण्यासाठी स्थायी समितीची मंजुरी आहे तर त्याचे इस्टीमेट तयार होण्यासाठी उशिर का होत आहे. त्यांना तुम्ही मोबाईल दिलेले आहेत. ते ही आमच्या नागरिकांच्या पैशातून, ते तर चालू ठेवायला सांगा. त्यांना पाच नंतर भेटायचे का?

श्री. बारवाल गजानन : मला या ठिकाणी असे सांगायचे आहे की, सर्व स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता व मा आयुक्तांनी अधिकारी वर्गाच्या आतापर्यंत अनेक बैठका घेतलेल्या असतील त्यांना या कामाची सर्व माहिती असेल त्यांच्या कडून खुलासा घ्या. आजची सद्य: परिस्थिती काय आहे याची त्यांना माहिती आहे.

सौ. रजनी जोशी : कामे होणार आहेत किंवा नाही. सगळे प्रश्न आपल्या पुढे मांडले आहेत तुम्ही याचा खुलासा करा.

श्री. बारवाल गजानन : मा. आयुक्त साहेबांकडुन त्याचा खुलासा घ्यावा.

सौ. रजनी जोशी : कामे कधी होणार आहे याचा खुलासा करा.

श्री. बारवाल गजानन : याबाबत मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : सिडकोच्या टेंडर नोटीसा गेलेल्या आहेत. १५ दिवसामध्ये सगळे टेंडरचे कामे होतील.

श्री. बारवाल गजानन : असा खुलासा नको. मा.आयुक्तांकडून सविस्तर खुलासा घ्या.

श्री. डांगे बाबासाहेब : तयार केलेले इस्टीमेंट कॅन्सल करा. कामे होत नाही म्हणून सांगुन द्या.

मा. उप महापौर : सर्व सदस्यांनी जागेवर बसुन घ्या. सविस्तर खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता : सन २००५-२००६ मध्ये स्पील ओव्हर झालेले कामे आहेत. त्यापैकी जवळ जवळ ७०% कामे आमची चालू आहेत आणि सन २००६-२००७ च्या बजेटबुक मधील जवळ जवळ ७०% अंदाजपत्रक तयार झालेले आहेत. त्यांची अकाऊंटींग, मंजुरी होऊन येत्या १५-२० दिवसात सगळ्यांचे टेंडर निघणार आहेत.

सौ. रजनी जोशी : टक्केवारी सांगु नका कामे किती चालू आहेत कसे चालू आहेत ते सांगा,टक्केवारी सांगु नका.

श्री.काशिनाथ कोकाटे : बाकीच्या कामाचे काय आहे सविस्तर खुलासा करा. टक्केवारीत सांगु नका.

शहर अभियंता : आता एवढे माझ्याकडे डिटेलमध्ये पुर्ण नाही. मी तुम्हाला वार्डवाईज माहिती देईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : वॉर्ड्वाईज माहिती मागवुन घ्या. कोणत्या वॉर्डात किती कामे चालू आहेत, किती पुर्ण झालीत किती चालु होणार आहेत.

सौ. रजनी जोशी : ७०% कामे झालीत, मग ३०% कामे का राहिलीत याचे देशील उत्तर द्या.

शहर अभियंता : वार्डवाईज सर्वांना डिटेल देऊ.

मा.उप महापौर : सर्व स. सदस्यांनी खाली बसुन घ्या.

सौ. लता दलाल : मा. आयुक्तांना सर्वच विभागाचा खुलासा करून द्या.

मा. उप महापौर : वॉर्डवाईज सर्व माहिती काढून घ्या. आठ दिवसात सर्वांना द्या.

शहर अभियंता : वॉर्डवाईज माहिती काढून सर्वांना देतो, ह्या १५ दिवसात टेंडर निघणार आहेत. एक महिन्यात सर्वांचेच टेंडर निघणार आहे.

मा.उप महापौर : सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन,१५ दिवसामध्ये सर्व कामांची सविस्तर माहिती घेऊन, टेंडर निघुन स.सदस्यांना त्यांची यादी व त्यांच्या वॉर्डातील कामे ज्या स्थितीला आहेत याची माहिती देण्यात यावी आणि विषय क्र.१

**विषय क्र. २६८/१ :**

दिनांक ३१/०३/२००६ व दिनांक ०५/०४/२००६ (दि.३१/०३/२००६ ची तहकूब) रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा. उप महापौर विषय क्र. १ मंजुर.

**ठराव :**

दिनांक ३१/०३/२००६ व दिनांक ०५/०४/२००६ (दि.३१/०३/२००६ ची तहकूब) रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. २६९/२ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, शहरातील नागरी वस्तीमधून वाहणाऱ्या नाल्यावर बऱ्याच नागरीकांनी अतिक्रमण करून घरे बांधली आहेत. त्यामूळे शहरातील नाल्यांना पावसाळ्यात पाणी आल्यास नागरिकांचे घरात पाणी घुसून नागरिकांच्या मालमत्तेचे नुकसान होते. सदरील नुकसान टाळण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे नाल्यात अडथळे आणणाऱ्या अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण करून एकूण १५१३ बांधकामांना नोटीस देण्यात आली होती. तथापी नोटीस देवूनही नागरिकांनी बांधकामे काढून घेतली नाहीत. करीता सर्व अतिक्रमणे व नाला प्रवाहास अडथळा निर्माण करणारी बांधकामे तोडून त्या नागरीकांचे पूनर्वसन महानगरपालिकेच्या मालकीच्या हर्सूल, नक्षत्रवाडी इत्यादी ठिकाणी असलेल्या जागेवर करणेसाठी जमीनीचे रेखांकन करून त्यात छोटे प्लॉट पाडून त्यांचे वाटप करण्यास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव यापूर्वी मा.सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यात आला होता, तथापी सदरील प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला. आता पावसाळा जवळ आल्याने नाल्यामधील नाला प्रवाहास अडथळा निर्माण करणारी अनधिकृत बांधकामे पाडून त्यात बाधीत होणाऱ्या नागरिकांना नारेगांव येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या जमीनीचे रेखांकन करून बाधीत व्यक्तींना भूखंड वाटप करणे व सदरील रेखांकन विकसीत करण्यासाठी करावयाच्या कामांचा खर्च (उदा.रस्ते,ड्रेनेज,पाणी,खुली जागा विकसीत करणे, विद्युत कामे) संबंधीत नागरिकांकडून वसूल करणे बाबत प्रस्तावास तत्वत: मान्यता होणे आवश्यक आहे. सदरील प्रस्तावास मान्यता झाल्यास नाल्यामधील नाला प्रवाहास अडथळा आणणारी अनधिकृत बांधकामे तोडणे व नाला सफाई करून नाला प्रवाह खुला करणे हे काम हाती घेता येईल. अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये रूपये ५०.०० लक्षची तरतूद गाजर गवत निर्मूलन व नाला सफाई या लेखाशिर्षाखाली करण्यात आली असून, या तरतूदीमधून नाल्यातील अनधिकृत बांधकामे तोडणे, नाला साफ करणे व बाधीत नागरिकांचे महानगरपालिकेच्या नारेगांव यथील जागेत रेखांकन करून पुनर्वसन करणे बाबत मान्यता मिळणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात येत आहे. या प्रस्तावास मान्यता मिळाल्यास नारेगांव येथील भूखंड योग्य ती किमंत आकारून संबंधीत नागरिकांना वाटप करण्यात येतील.

**संवाद :**

श्री.पांडे विनायक : १५१३ बांधकामांना नोटीस देण्यात आली होती. नोटीस देवूनही नागरीकांनी बांधकामे का काढून घेतली नाहीत. ज्यावेळी नागरीक तेथे बांधकाम करतो त्यावेळी त्याने स्वत: तेथे अतिक्रमण केलेले नाही. त्याला कोणी तरी ही जागा विकलेली आहे. ज्यांनी ही जागा विकलेली आहे. त्यांच्यावर गुन्हे दाखल करून हा विषय मंजुर करण्यांत यावा.

श्री.कुचे नारायण : माझा प्रशासनाने एक खुलासा करावा की, शहरातील ६०% वसाहतीमधून नाला गेलेला आहे. नाल्यावर ६०% बांधकामापैकी गुंठेवारी भागात ४०% बांधकाम केलेले आहेत. शहरात अधिकृत नाले गेलेले आहेत. आपण गुंठेवारी भागातील नागरिकांना देखील नोटीसा दिलेल्या आहेत. त्यावर काही कार्यवाही करणार आहे का? पण ज्या ठिकाणी महानगरपालिकेची जागा आह. ते अतिक्रमण होण्यास महानगरपालिका कारणीभुत आहे. महानगरपालिकेने त्यांना परवानगी दिलेली नाही, अशांना देखील पर्यायी जागा देणार आहात का? तर माझे म्हणणे असे आहे की, अशांना तुम्ही पर्यायी जागा देवू नका. पण ज्यांना महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे, त्यांना पर्यायी जागा देवून त्यांचे लवकरात लवकर पुनर्वसन करून द्यावे, अशी आपणांस विनंती आहे.

मा.आयुक्त : यामध्ये एकच अडचण आहे. आपल्याकडे नारेगांवला जी जागा आहे, त्यामध्ये ५२५ प्लॉटस पडतात त्याठिकाणी ज्यांच्याकडे प्रॉपर्टी कार्ड आहे, त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल. बाकीचे जे प्लॉटस आहेत ते आपल्याकडे ठेवण्यात काही अर्थ नाही, त्या ठिकाणी जागा देते वेळेस यांना प्रथम प्राधान्य देवून व किमंत घेवून प्लॉट दिले जातील.

सौ.लता दलाल : आताच मा.आयुक्तांनी म्हटले आहे की, ज्यांच्याकडे प्रॉपर्टी कार्ड असतील त्यांना हे प्लॉटस् देण्यांत येतील. पण मा.सुप्रीम कोर्ट, मा.हायकोर्टाचे आदेश आहेत की, नाले ही गव्हर्नमेंटची प्रॉपर्टी आहे, महानगरपालिकेची प्रॉपर्टी आहे तरी सुध्दा नागरीकांनी यावर बांधकाम केले आहे. प्रॉपर्टी कार्डाची पूर्ण चौकशी झाल्याशिवाय यावर रिकामा खर्च करू नये. अशी आपणांस विनंती आहे. त्यांना, ज्यांनी प्रॉपर्टी कार्ड दिले त्यांच्यावर गुन्हे दाखल करून कारवाई करण्यांत यावी.

मा.आयुक्त : प्रॉपर्टी कार्ड हे स्टेट गव्हर्नमेंटने दिलेले आहेत.

सौ.लता दलाल : स्टेट गव्हर्नमेंटने जरी दिले आहेत तरी गव्हर्नमेंटकडे भूमी अभिलेखचे रेकॉर्ड असते ते चेक करा, त्यामध्ये तर सापडेल.

श्री.डॉ.भागवत कराड : माझी मागणी अशी आहे की, जे प्रॉपर्टी कार्ड आहे ते खरे आहे का? याची सुध्दा चौकशी होणे गरजेचे आहे आणि खरे असेल तर ते कुठल्या अधिकाऱ्याने दिलेले आहे? कूठल्या वर्षी दिलेले आहे? कारण नाल्याची जमीन ही महानगरपालिकेची देखील नसून शासनाची आहे. मग ते पी.आर.कार्ड बनले कसे याची देखील चौकशी होणे गरजेची आहे. चौकशी करूनच मग पर्यायी जागा देणे योग्य आहे.

मा.आयुक्त : आपणाला जर त्यांनी प्रॉपर्टी कार्ड दाखविले तर ते प्रॉपर्टी कार्डाची यादी करून स्टेट गव्हर्नमेंटला दाखवून हे प्रॉपर्टी कार्ड बनले कसे याची चौकशी करू. पण प्रॉपर्टी कार्ड हे स्टेट गव्हर्नमेंटने दिलेले आहे, त्याची चौकशी हे स्टेट गव्हर्नमेंट करेल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : औरंगाबाद शहरामध्ये बरेचसे जे पी.आर.कार्ड बनलेले आहे, ते वेगळ्या जागेचे आहे आणि ते वसलेले वेगळ्या जागेवर आहेत. अशी बरीचशी तफावत आपणांला तेथे पहायला मिळेल. नाल्यावरचे प्रॉपर्टी कार्ड मिळणे शक्य नाही. ज्या कोणी गृहस्थाने संगणमत करून प्रॉपर्टी कार्ड काढलेले असेल त्या ठिकाणी त्यांनी नाला दाखविलेला नसेल,त्याची देखील चौकशी व्हावी. सरकारकडूनही याची चौकशी केली जावी. या दृष्टीनेच ही कार्यवाही केली जावी.

सौ.घोडेले अनिता : नक्षत्रवाडीत जर पुनर्वसन करणार असाल तर, नगरसेवकांना विश्वासात घ्या. मनपाच्याच जागेत करणार आहात का? जागेचे आरक्षण केलेले आहे का नाही? त्याचा अहवाल द्या. त्याचा खुलासा करा.

मा.आयुक्त : आपण जेथे पुनर्वसन करणार आहोत ती जागा विकास योजनेत विस्थापितांचे पुनर्वसनसाठी ठेवलेली आहे. या व्यतिरिक्त शासनाकडून जमीन मिळेल त्यावेळी सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यात येईल.

श्री.अ.रशिदखान (मामु) : नाल्यावरील बांधकामे आहेत, त्या नाल्याची देखिल सफाई व्हावी.

मा.उपमहापौर : मा.आयुक्तांनी याचा खूलासा करावा.

मा.आयुक्त : शहरामधील १००% नाल्यांचा यामध्ये समावेश आहे. जेंव्हा आपण नाल्यावरील अतिक्रमण काढणार, त्यावेळी आपण त्यांनी कोणाकडून तरी विकत घेतलेले आहेत. ते त्यांच्याकडे प्रॉपर्टी कार्ड असेल तर ते तितकी जागा आपल्या नांवावर करून घेवून त्यांचे पुनर्वसन करण्यांत येईल. पण जर खरोखर अतिक्रमण असेल तर त्यांनी त्या जागेचे पूर्ण पैसे दिल्यानंतरच त्यांना ती जागा दिली जाईल. नाल्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी पूर्ण शहराचा समावेश आहे.

श्री.अ.रशिदखान (मामु) : नाल्यावर झालेले बांधकाम पूर्णच पाडणार आहात का?

श्री.गजानन बारवाल : आताच मा.आयुक्तांनी यावर सविस्तर खुलासा केलेला आहे तो खुलासा यावर पुरेसा नाही. कारण आज जर आपण शहरामध्ये बघितले तर शहरामध्ये खूप मोठे नाले आहेत. नाल्यावर वेगवेगळ्या प्रकारे अतिक्रमणे झालेले आहेत. काहींनी नाल्यावर प्लॉटस् पाडून विकलेले आहेत. मा.आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे पुनर्वसन करणे कितपत योग्य आहे. कारण त्यांचे पुनर्वसन करणे म्हणजे पर्यायी जागा देणे कितपत योग्य आहे. कारण हे अतिक्रमण थांबणारे नाही. त्या ठिकाणी पुन्हा दुसरे येवून बसतील आणि त्यामूळे हे करणे बरोबर नाही, यासाठी आपणांस विनंती आहे की, पुनर्वसन करू नये. नाल्यावर झालेले अतिक्रमणे पाडून नाल्याच्या पाण्याचा प्रवाह योग्य दिशेने करण्यांत यावा. ही आपणांस विनंती आहे.

मा.आयुक्त : यामध्ये एकच अडचण आहे की, थोड्या लोकांकडे प्रॉपर्टी कार्ड आहे. त्यांचे अतिक्रमण काढल्यानंतर तितक्याच किमंतीची जागा त्यांना देण्यांत येईल. एक इंच जागा पण फ्रिमध्ये नाही. पुनर्वसनामध्ये एकही इंच जागा फ्रिमध्ये दिली जाणार नाही. सगळ्या जागा किमंत घेवूनच देण्यांत येणार आहे.

श्री.गजानन बारवाल : ठिक आहे, मा.आयुक्त साहेबांनी जो खुलासा केला त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. परंतु यामध्ये महत्वाची एक घटना अशी आहे की, यामध्ये असे सांगितले की, हर्सूल,नारेगांव आणि इतर ठिकाणी नेमकी आपण कोणती जागा देणार आहोत. हा एरिया कशामधून निवडणार आहात त्याठिकाणी महानगरपालिकेची जागा आहे का? किती प्रमाणात आहे? कोणत्या पध्दतीने दिली आहे? किती बाय कितीची जागा आपण देणार आहात? त्यासाठी आपण निकष कसे लावलेले आहेत? याची माहिती सुध्दा पाहीजे.

मा.आयुक्त : आपण ज्या ज्या ठिकाणी आपले रिझर्वेशन आहेत. पुनर्वसनासाठी जागा आहे. नारेगांवला चार-पाच एकरची या आरक्षणाची जागा आहे. त्याठिकाणी आपण देणार आहोत. त्यांनी घेवो अथवा ना घेवो आपण तर तोडणार आहेच. त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी खर्च लागणार आहे. तो त्यांच्याकडून वसूल करण्यांत येईल आणि त्यांना प्लॉट देतांना शासनाने ठरवून दिलेल्या कमीत कमी साईजची जागा आपण त्यांना देणार आहोत.

श्री.डॉ.भागवत कराड : १५१३ अतिक्रमण तोडून आपण त्यांना पर्यायी जागा देणार आहोत असा येथे प्रस्ताव आहे. लोकांसाठी आरक्षित आहे. त्याच ठिकाणी करणार आहोत. जेथे याच्या व्यतिरिक्त कांचनवाडी, इतर ठिकाणी जागा ही गव्हर्नमेंटकडून नॉमिनल

फीस भरून घेवू त्यावेळी डी.जी.साठीचा विचार केला जाईल. ज्यांना परवानगी दिली आहे, त्यांचाच विचार करण्यांत यावा.

श्री.अ.रशिदखान (मामु) : मा.आयुक्त साहेब, आपण जे नाले सफाई प्रत्येक वर्षी करतो काही ठिकाणी नाल्यावर मोठाल्या बिल्डींग झालेले आहेत त्या ठिकाणी आपल्या येथील मजुर नाले साफ करू शकत नाही. कारण त्या ठिकाणी जास्त दुर्गंधी येते. त्याचे पैसे विनाकारण खर्च होते. ते साफ करण्यासाठी मुंबईहून मजुर मागवून बिल्डींगवाल्याकडून पैसे वसूल करून नाले सफाई करून घ्यावी. जोपर्यंत यावर आपण काही कार्यवाही करणार नाही तोपर्यंत यावर खर्च करीत रहावे लागेल. आपण साफ करून त्यांच्याकडू पैसे वसूल करण्यांत यावे. आपले मजुर १० फुट नाला साफ करतात आणि निघुन येतात आपणाला सांगतात की, नाला झाला, हे प्रत्येक वर्षी असेच होते. २०० फुटाची बिल्डींग असते आणि १० फुट साफ करतात पुढे कचरा तसाच असतो, मुंबईत कसे करतात त्या पध्दतीने या ठिकाणी सफाई झाली पाहीजे, येवढेच आमचे म्हणणे आहे.

शहर अभियंता : आपण नाल्यावरील बिल्डींगवाल्यांना तशा नोटीसा दिलेल्या आहेत की, आपल्या बिल्डींग खालील नाला साफ करून द्यावा. त्यांनी जर तो साफ केला नाही तर तो नाला आपण साफ करून त्यांच्याकडून त्याचे पैसे वसूल करण्यांत येईल.

श्री.गजानन बारवाल : बिल्डींग खालील नाले साफ करतांना आपणाला विशेष दखल घ्यावी लागेल.

श्री.अ.रशिदखान (मामु) कारण त्याखाली एवढा भयंकर गॅस निर्माण होतो, त्याठिकाणी कोणी मनुष्य जावूच शकत नाही, त्या ठिकाणी त्या मजुरांच्या पाठवर गॅसची टाकी देवून समोर लाईट लावून त्या ठिकाणी नाले सफाई होवू शकते. तसेच आपण मागच्या वेळेस विहीर साफ करीत असतांना मोठी घटना झाली तसीच घटना त्याठिकाणी होवू शकते. त्यामूळे आपणाला काम करतांना गंभीर दखल घ्यावी लागेल.

मा.आयुक्त : आपण त्यांना जी मुदत दिली होती, ती जर संपली असेल तर त्याचे इस्टीमेट तयार करा. १७% सुपरव्हिजन चार्जेस लावा आणि ५०% त्यांच्याकडून फाईन वसूल करा आणि आपल्या लोकांकडून हे काम करून घ्यावे.

श्री.अ.रशिदखान (मामु) : आपण त्यांना काम करण्यास पाठवितो, त्यांना काम करून घेण्यास सांगतो, ते १० फुट काम करतात आणि निघुन येतात, आपण त्यांना विचारले काम झाले का? ते हो म्हणतात. मात्र प्रत्यक्ष काम काही होत नाही.

श्री.संजय जोशी : मामु जे म्हणत आहेत, यामागे त्यांचा अनुभव आहे. त्यांचे म्हणणे खरोखर बरोबर आहे. आपण राखी टॉवर्सची जेंव्हा पाहणी केली होती, तसेच शहरामध्ये १० ठिकाणे असे आहेत, ज्यांचे मी नांवे या ठिकाणी घेत नाही. त्याठिकाणी दुकाने आहेत. त्या दुकानाचे खरच स्लॅब पाडून नाले साफ करणार आहोत का? कारण आज आपण ५०%,२०% फाईन लावून हे साफ करणार आहोत असे म्हटल्यावर उद्या सर्वत्र वृत्तपत्रामध्ये येईल. खरच आपण दुकानाचे स्लॅब पाडून साफ करणार आहोत का?

मा.आयुक्त : नाला साफ करतेवेळी एखाद्या ठिकाणी जर सफाई करता येत नसेल तर त्या ठिकाणी टेक्नीकल प्रोसीसने करून पाहू जर त्यानेही स फाई करता येत नसेल तर त्या ठिकाणचा स्लॅब पाडून साफसफाई करण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल : हे करावेच लागेल, कारण हे आपल्या अधिकारात आहे. ज्या ठिकाणी नाला साफ करण्यासाठी जागा नसेल त्यावरील स्लॅब पाडून, नाला साफ करण्यासाठी जागा करून खरोखरच तो नाला साफ केला जावा.

मा.उपमहापौर : ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या अडचणी असतील, त्या त्या ठिकाणी स्वत: शहर अभियंता यांनी भेट देवून त्या ठिकाणी तांत्रिक अभ्यास करून, साफसफाई करण्याचा प्रयत्न करावा जर टेक्नीकलने सुध्दा हे काम जमत नसेल त्या ठिकाणी असलेल्या बिल्डींगचा स्लॅब पाडून नाले सफाई करण्यात यावी. प्रॉपर्टीकार्डाची काळजीपूर्वक चौकशी करून,जो भाग आचार संहितेचा भाग वगळून या ठरावास मंजुरी देण्यांत येते. विषय क्र.२ यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहरातील नाल्यामधील नाला प्रवाहास अडथळा निर्माण करणारी अनधिकृत बांधकामे पाडून त्यात बाधीत होणाऱ्या नागरिकांना बाधीत मिळकत धारकांचे मालमत्तेचे मालकी हक्क तपासणी करून, नारेगांव येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या जमीनीचे रेखांकन करून बाधीत व्यक्तींना भूखंड वाटप करणे व सदरील रेखांकन विकसीत करण्यासाठी करावयाच्या कामांचा खर्च (उदा.रस्ते,ड्रेनेज,पाणी,खुली जागा विकसीत करणे, विद्युत कामे) संबंधीत नागरिकांकडून वसूल करणेस तसेच नाल्यामधील नाला प्रवाहास अडथळा आणणारी अनधिकृत बांधकामे तोडणे व नाला सफाई करून नाला प्रवाह खुला करणे हे काम करणेस येणाऱ्या र.रू.५०.०० लाख खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, सदरील खर्च अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये रूपये ५०.०० लक्षची असलेल्या तरतुदीमधून करणेस तसेच नाल्यातील अनधिकृत बांधकामे तोडणे, नाला साफ करणे व बाधीत नागरिकांचे महानगरपालिकेच्या नारेगांव येथील जागेत रेखांकन करून पुनर्वसन करणे व येथील भूखंड योग्य ती किमंत आकारून संबंधीत नागरिकांना वाटप करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७०/३ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०२००४/प्र.क्र.१६८/नवि-२०, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई दि.२९.१२.२००४ नुसार राज्यातील महानगरपालिकांमार्फत शालेय व उच्च शिक्षण संबंधित पुस्तके, संदर्भ ग्रंथ तसेच इतर सर्व भाषांतील सर्व पुस्तकांवर जकात आकारण्यात येवू नये व याबाबत महानगरपालिकांच्या जकात नियमावलीमध्ये आवश्यक बदल करण्यात यावा असे राज्यातील सर्व महानगरपालिकांना वरील शासन निर्णयाद्वारे निर्देश देण्यात आलेले आहेत.

औरंगाबाद महानगरपालिकेने यापूर्वी शासन निर्णय क्र.एएमसी/१४९७/१४६२/प्र.क्र.-१६७/९७/नवि-२४,मंत्रालय, मुंबई-३२ दि.५ फेब्रुवारी,२००० अन्वये महानगरपालिका हद्दीत आयात होणारे शालेय व महाविद्यालयीन शैक्षणिक संबंधीत क्रमिक पुस्तके या मालावर दि.१२.०७.२००० पासून जकात कर माफि देण्यात आलेली आहे. परंतू संदर्भ ग्रंथ तसेच इतर सर्व भाषांतील सर्व पुस्तकांवर जकात कर माफि देण्यात आलेली नाही.

वरील शासन निर्णय दि.२९.१२.२००४ नुसार शालेय व उच्च शिक्षण संबंधित पुस्तके, संदर्भ ग्रंथ तसेच इतर सर्व भाषांतील सर्व पुस्तकांवर जकात माफि देण्याचे झाल्यास औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम-१९८४ मधील नियम-५ मधील जकात माफिच्या यादीमध्ये सदर मालाचा समावेश करून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम-१२७ (२), १४९ (१) व ४५४ अन्वये दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

करीता औरंगाबाद महानगरपालिकांच्या क्षेत्रात आयात करण्यात येणाऱ्या शालेय व उच्च शिक्षण संबंधित पुस्तके, संदर्भ ग्रंथ तसेच इतर सर्व भाषांतील सर्व पुस्तकांवर जकात माफि देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.डॉ.भागवत कराड : विषय क्र.३ यामध्ये महाराष्ट्र शासनाचा निर्णय आहे, असे प्रशासनाकडे पत्र आलेले आहे. पण हे केल्यानंतर त्यामूळे शालांत पुस्तक असतील किंवा उच्च

शिक्षणाचे ग्रंथ असतील त्यामूळे महानगरपालिकेचे उत्पन्न काही तरी कमी होणार आहे. तर प्रशासनाने किती उत्पन्न कमी होणार आहे. याची आकडेवारी काढलेली आहे का? महानगरपालिकेचे यामध्ये किती नुकसान आहे हे काढलेले आहे का? आहे, तर किती आहे याची माहिती आहे का? आपण हा निर्णय घेतल्यामूळे महानगरपालिकेच्या कामावर काही परिणाम होणार आहे का? कारण आता बजेट तयार झालेले आहे. म्हणून मा.महापौर साहेब यांना माझी अशी विनंती आहे की, हा विषय एवढ्या वर्षापुरता स्थगीत करावा. नाही तर यावर अगोदर खुलासा करावा व नंतर निर्णय घ्यावा.

श्री.गजानन बारवाल : मा.महापौर साहेब हा खुलासा करतांना माझी अशी नम्र विनंती आहे की, आपल्याला माहिती आहे की, पुस्तकाची एम.आर.पी.वेगळी असते, आणि ओरीजनल किमंत वेगळी असते. कमीत-कमी ५०% यात फरक असतो. त्यामूळे यावर योग्य तो विचार करावा. कारण त्यांना यावर सुट देण्यात काही अर्थ नाही.

श्री.संजय जोशी : सन २००४ चा हा जी.आर.आहे. हा आधिच मंजुर होणे आवश्यक होते. हा शासनाचा आदेश आहे आणि शैक्षणिक आहे.

मा.आयुक्त : आपण सोडून पूर्ण राज्यामध्ये आहे. आपल्याला मागील वर्षी ३० लाख मिळाले होते. आपण हा ठराव मंजूर केल्यानंतर त्याची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी म्हणजे पेपरमध्ये जाहिरात देणे, हरकती मागविणे आणि शासनाकडे पाठविणे यात ५-७ महिने जातील. ऑर्डर येईल, आपण पुढच्या वर्षीपासून अंमलबजावणी करू.

श्री.डॉ.भागवत कराड : मा.आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे ३० लाख रूपये कमी जरी येत असतील तरी पण मला वाटते. शालेय ग्रंथ आहेत, त्यामूळे महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरीकांचे विशेषत: विद्यार्थ्यांचा फायदा होईल, त्यामूळे यावर्षी नाही तर पुढच्या वर्षी तरी याचा फायदा होईल, म्हणून हा विषय मंजुर करावा.

मा.उपमहापौर : विषय क्र.३ पुढच्या वर्षी पासून मंजुरी देण्यांत येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय क्र.संकिर्ण-१०२००४/प्र.क्र.१६८/नवि-२० नगरविकास विभाग मंत्रालय,मुंबई दिनांक २९.१२.२००४ नुसार औरंगाबाद महापालिका हद्दीत आयात होणारे शालेय व उच्च शिक्षण संबंधीत पुस्तके, संदर्भ ग्रंथ तसेच इतर सर्व भाषेतील,सर्व पुस्तकावर पुढील आर्थिक वर्षापासून जकात कर माफ करण्यास आणि औरंगाबाद महापालिका जकात नियम १९८४ मधील नियम ५ मधील जकात माफिच्या यादीमध्ये सदर मालाचा समावेश करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>स.सदस्यांचे प्रस्ताव</u>

**<u>विषय क्र. २७१/४ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,औरंगाबाद शहरासारख्या ऐतिहासिकदृष्ट्या नावाजलेल्या या सिध्दार्थ उद्यानामध्ये (पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यानामध्ये संत ज्ञानेश्वरांचे २५ फुट पुर्णाकृती पुतळा बसविण्यात आलेला आहे ) त्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानामध्ये तथागत भगवान सिध्दार्थ गौतम बुध्द यांचा २५ फुट पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी राष्ट्रीय युवा लोक संघटना यांनी वारंवार मागणी केलेली आहे, त्यानुसार सिध्दार्थ उद्यानात तथागत भगवान सिध्दार्थ गौतम बुध्द यांचे पुर्णाकृती पुतळा बसविण्यास प्रस्ताव सर्वानुमते विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय शिरसाट

अनुमोदक : श्री.पुरूषोत्तम रघुविरसिंग ठाकुर, श्री.सतिष कटकटे, श्री.संतोष खेंडके, श्री.बाबासाहेब डांगे, श्री.बन्सीलाल गांगवे (मामा),सौ.रजनी जोशी, सौ.राऊत छाया, सौ.मिटकर शोभा, श्री.रविंद गांगे,सौ.कला बोरामणीकर, श्री.दामोधर शिंदे, श्री.भाऊसाहेब वाघ,श्री.संजु रिडलॉन

**संवाद :**

श्री.डॉ.भागवत कराड : विषय क्र.४ चे सुचक सभागृहामध्ये नाही. यामध्ये विषय असा आहे की, सिध्दार्थ गार्डनमध्ये गौतमबुध्द यांचा पुतळा उभारण्यांत यावा. हा विषय ऑलरेडी मंजुर करण्यात आलेला आहे. यासाठी बजेट ठेवलेले आहे. त्यामूळे हा विषय घेण्याची गरज नाही.

मा.उपमहापौर : विषय क्र.४ माजी उपमहापौर श्री.राजु शिंदे यांनी जो ठराव ठेवला होता तो मंजूर झालेला आहे. त्यावर योग्य ती कार्यवाही त्वरीत करण्यांत यावी.

श्री.गजानन बारवाल : माझे म्हणणे असे आहे की, या विषयावर आजपर्यंत कार्यवाही का करण्यात आली नाही? त्याचप्रमाणे महाराणा प्रताप पुतळा उभारण्यास देखील मान्यता झालेली आहे. दोन्ही कामे बरोबरच सुरू झाली पाहिजेत. याची थोडी दखल घेण्यात यावी.

मा.उपमहापौर : शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : बजेट तयार केले आहे. मंजुरीस्तव शासनाकडे पाठविले आहे.

श्री.कवंरसिंग बैनाडे : आज या सभागृहामध्ये मागच्या चार महिन्यापूर्वी ठराव पास करून घेतला होता. आपल्या सभागृहामध्ये महाराणा प्रताप यांचे तैलचित्र लावण्यात यावा म्हणून, त्याला सभागृहाने एकमताने मंजुरी दिली होती, आता सहा महिने झाले तेंव्हा पासून महाराणा प्रताप यांचे तैलचित्र का लावण्यात आले नाही, याचा खुलासा करावा.

शहर अभियंता : महाराणा प्रताप पुतळ्याची जागा निश्चित ठरलेली नाही.

श्री.कवंरसिंग बैनाडे : पुतळ्याचा प्रश्न नंतरचा आहे. तैलचित्र आतापर्यंत का लावण्यात आले नाही. सभागृहाने एकमताने मंजुरी दिलेली आहे.

शहर अभियंता : तैलचित्राचीच जागा निश्चित केलेली नाही.

श्री.कवंरसिंग बैनाडे : किती दिवसात लावणार ते सांगा.

श्री.गजानन बारवाल : मा.महापौर साहेब आपण आदेश द्या की, किती दिवसात महाराणा प्रताप यांचा पुतळा लावण्यात येईल म्हणून.

श्री.विनायक पांडे : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या बाजूला लावा. तेथे जागा आहे.

मा.उपमहापौर : एक महिन्याच्या आत लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.संजय जोशी : डॉ.कराड महापौर असतांना, डॉ.हेडगेवार यांचा फोटो येथे लावायचा असा ठराव झालेला आहे.

मा.उपमहापौर : जे जे ठराव झाले असतील, त्याची अंमलबजावणी करण्यांत यावी.

श्री.कवंरसिंग बैनाडे : सेव्हन हिलच्या बाजुला एम.जी.एम.हॉस्पीटलच्या समोर, महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारण्यात यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : ठराव झालेला आहे मग कार्यवाही का झाली नाही. जागा असल्यावरही कार्यवाही का करण्यात येत नाही.

श्री.कवंरसिंग बैनाडे : एम.जी.एम.च्या समोर पुतळ्याची जागा निश्चित केलेली आहे. तेथे तो लावण्यात यावा.

श्री.डॉ.भागवत कराड : स.सदस्य बैनाडे म्हणतात, त्यानुसार महाराणा प्रताप यांचा पुतळा मी महापौर असतांना पदमपुरा भागात चौकात लावण्याचा ठराव मंजुर झाला होता. त्यानंतर दुसरा ठराव अमरप्रित हॉटेल समोर पुतळा लावण्यात यावा, असे तत्कालीन महापौर यांनी मंजुर केला होता. आता तिसरा ठराव होत आहे. एम.जी.एम.च्या समोर. आता तरी याची कार्यवाही करावी. महाराणा प्रताप एक थोर महापुरूष होते. ठराव झाल्यानंतर प्रशासन याकडे दुर्लक्ष का करत आहे. तरी आपण

लवकरात लवकर स्विकृतीसहीत मंजुरी द्यावी व लवकरात लवकर याच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

मा.उपमहापौर : डॉ.कराड,स.श्री.बैनाडे,स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर आणि स.श्री.बारवाल यांच्या सूचना लक्षात घेवून त्वरीत या ठरावावर कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान येथे तथागत भगवान गौतम बुध्द यांचा २५ फुट पुर्णाकृती पुतळा उभारण्यास यापूर्वीच या सभागृहाने मंजुरी दिली आहे. त्याची अमंलबजावणी करण्यास तसेच महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारण्यास मंजुरी झालेली आहे. तो एम.जी.एम. समोर उभारण्याची कार्यवाही करण्यास आणि सभागृहात तैलचित्र लावण्याबाबत झालेल्या ठरावांची अमंलबजावणी करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. २७२/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.७३ ठाकरेनगर येथील सिडको एन-२ कम्युनिटी सेंटर यास येथील नागरीकांच्या मागणीनुसार स्व.भाऊरावजी खैरे यांचे नाव देण्यास प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव ठेवण्यात यावा.

सुचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे

अनुमोदक : श्री.बाबासाहेब लक्ष्मण डांगे, श्री.बन्सीलाल गांगवे, श्री.नारायण कुचे, श्रीमती जयश्री किवळेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७३ ठाकरेनगर येथील सिडको एन-२ कम्युनिटी सेंटर यास स्व.भाऊरावजी खैरे यांचे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.उपमहापौर : ऐनवेळचे विषय मंजूर.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. २७३/१ :**

या शहरात पाणी पुरवठ्यासाठी समांतर जलवाहीनी टाकण्याचा ठराव पारीत झाला, पण त्या बरोबर शहरात डिस्ट्रीब्युशन नेटवर्क सुद्दा बदलण्याची गरज आहे. तरी समांतर जलवाहीनी व डिस्ट्रीब्युशन साठी महाराष्ट्र शासनाकडे निधी साधारण ५०० कोटी मागावा.

सुचक : श्री.भागवत कराड,श्री.गजानन बारवाल,श्री.महेश माळवतकर,श्री.पुरूषोत्तमसिंग ठाकुर,
श्री.कैलास गायकवाड

अनुमोदक :श्री.रेणुकादास वैद्य,श्री.संजय जोशी,श्री.भाऊसाहेब ताठे,श्री.काशिनाथ कोकाटे,सौ.लता दलाल

**संवाद :**

श्री.डॉ.भागवत कराड : चार दिवसापूर्वी आपले आयुक्त मा.गुप्ता साहेब,मा.आ.श्री.श्रीकांत जोशी, अधिकारी आणि काही पदाधिकाऱ्यांची मिटींग झाली. या ठिकाणी ५०० कोटी रूपयाची मागणी शहरातील पाणी पुरवठ्यासाठी मंत्रालयात महानगरपालिकेने शासनाकडे द्यावी आणि शासनाने ती शिफारस करून केंद्र शासनाकडे पाठवावी अशी चर्चा झाली. शहरामध्ये सध्या एक दिवसाआड पाणी येत आहे. त्यासाठी समांतर जलवाहीनी टाकण्याचे काम चालू आहे. १०-१५ वर्षानंतर एक दिवसाआड पाणी मिळणे देखील कठिण होईल, कारण शहर वाढत चालले आहे. यासाठी पाण्याचे वितरण व्यवस्था चांगली असली पाहीजे. ऐनवेळचा विषय ठेवण्यात येत आहे. यास मंजुरी देण्यात यावी.

मा.उपमहापौर : यास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, या शहरात पाणी पुरवठ्यासाठी समांतर जलवाहीनी टाकण्याचा ठराव पारीत झाला,त्याबरोबर शहरात डिस्ट्रीब्युशन नेटवर्क सुद्दा बदलण्याची गरज असल्यामूळे, समांतर जलवाहीनी व डिस्ट्रीब्युशन साठी महाराष्ट्र शासनाकडे र.रू.५०० कोटी निधीची मागणी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७४/२ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जाधववाडी येथे वाहतूक नगर विकसीत करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी दहा एकर क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत केले आहे. सदर वाहतूक क्षेत्रात पहिल्या टप्प्यात वाहतुक नगर विकसीत करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर असून,

सदरहू वाहतुक नगर विकसीत करण्यासाठीचे किमान प्राथमिक सुविधा पुरविण्यासाठी पहिल्या टप्प्यात पुढे नमुद विकास कामे हाती घ्यावयाची आहेत. सदर प्रकल्पाधिन क्षेत्रास संरक्षक भिंत बांधणे, वाहनतळ क्षेत्राचे सपाटीकरण व खडीकरण करणे, अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटींगद्वारे बांधणी करणे, स्टॉर्म ड्रेन व दुभाजक बांधणे, जलनि:सारण,पाणीपुरवठा व पथदिवे सुविधा पुरविणे आणि ३६.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याचा उर्वरित ०.७५ कि.मी. भाग जोड रस्त्यासाठी बांधणे ही प्राथमिक विकास कामे अंतर्भूत आहेत. सदर प्रमाणे पहिला टप्प्यातील सुविधा पुरविण्यासाठी रू.२००.०० लक्ष इतका खर्च आवश्यक आहे. तरी उपरोक्तप्रमाणे सुविधा पुरविण्यासाठी रू.२००.०० लक्ष खर्चास मान्यतेस्तव व सदरचा खर्च रस्ते अनुदान मधून करण्यास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल : विषय क्र.१ आणि २ मंजुर केले, याबद्दल आमचे म्हणणे नाही. एक बद्दल या प्रकारचे ठराव असतील तर ते सभागृहासमोर मांडून त्याला मंजुरी द्यावी. परंतु याचप्रकारे पूर्वी याचठिकाणी नक्षत्रवाडी गट क्र.३५ हा प्रस्ताव आपला मंजुर झालेला आहे की, या ठिकाणी जी जागा आहे, ती रहिवासी झोन म्हणून करण्यांत यावी हा ठराव मंजुर झालेला आहे. त्यावर कार्यवाही का करण्यात आली नाही. त्यावर सर्व स.सदस्यांच्या स्वाक्षरी आहे. ते सर्व मा.आयुक्तांच्या अधिकाराखाली आहे, त्यावर कार्यवाही व्हावी असे आपण या ठिकाणी घोषीत करावे.

श्री.संजय जोशी : जर महानगरपालिकेला वाहतूक बेट बनवावयाचे असेल तर या महानगरपालिकेला ६० एकर जागा लागणार आहे. शहर वाढले आहेत. वाहने वाढलेली आहेत, ट्रक्स वाढलेले आहेत. जर ठराव मंजुर करायचा असेल तर माझी विनंती अशी आहे की, अशाच प्रकारचे वाहतूक बेट आणखी एका ठिकाणी करावयाची आपली तयारी ठेवावी लागेल.

मा.उपमहापौर : मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जाधववाडी येथील वाहतूकनगर या वाहतूक क्षेत्रात पहिल्या टप्प्यात वाहतुक नगर विकसीत करण्याच्या प्राथमिक सुविधा पुरविण्यासाठी पहिल्या टप्प्यात प्रकल्पाधिन क्षेत्रास संरक्षक भिंत बांधणे, वाहनतळ क्षेत्राचे सपाटीकरण व खडीकरण करणे, अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटींगद्वारे बांधणी करणे, स्टॉर्म ड्रेन व दुभाजक बांधणे, जलनि:सारण,पाणीपुरवठा व पथदिवे सुविधा पुरविणे आणि ३६.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याचा उर्वरित०.७५किमी. भाग जोड रस्त्यासाठी बांधणे या प्राथमिक विकास कामाच्या पहिल्या टप्प्यातील सुविधा पुरविण्यासाठी रू.२००.०० लक्ष इतका आवश्यक खर्चास व सदरचा खर्च रस्ते अनुदान मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७५/३ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मौजे पडेगांव येथील गट क्र.१५/पैकी जमीन औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार ३० मि.

रूंद रस्ता या प्रस्तावाने बाधित क्षेत्र संपादन करण्यासाठी मिळकतधारक श्री.नजीब खान पिता हबिब खान यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दि.२३.०१.२००६ रोजी दिली आहे. उक्त खरेदी सूचनेनुसार ६ महिन्याच्या आत म्हणजे दि.२२/०७/२००६ पूर्वी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा सदरील आरक्षण मुक्त/व्यपगत होईल.

उपरोक्त आरक्षण खालील अर्जदार यांचे क्षेत्र सुमारे ३७५० चौ.मी.आहे. सदर भागाचा शिघ्र सिध्द गणक दर रू.८५०/- प्रती चौ.मी. असून वजावाटी जाता रू.२१ लाख इतका अंदाजे मोबदला होईल.

सबब उपरोक्त आरक्षणाखालील संपूर्ण क्षेत्र संपादन करण्यासाठी व त्यास लागणारा भूसंपादन खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.काशिनाथ कोकाटे : विषय क्र.१ व २ वाचून दाखविण्यात आला आहे. यामध्ये भूसंपादनाचा जो प्रस्ताव आहे, त्यामध्ये भूसंपादन करतांना किती मालमत्ता बाधित होत आहे. याची माहिती सभागृहाला देणे आवश्यक आहे. कारण यापूर्वी भूसंपादन करतांना अनेक घोटाळे झालेले आहेत. आम्ही त्याची माहिती घेतलेली आहे. त्यामूळे यापुढे कोणतेही भूसंपादन करतांना तो सुस्पष्ट असा प्रस्ताव सभागृहामध्ये आपल्या बाजूला नकाशा लावून त्याची मार्किंग करून शहानिशा करूनच त्यावर निर्णय घेण्यांत यावा. तोपर्यंत हा ठराव स्थगीत ठेवण्यात यावा.

श्री.संजय जोशी : या सभागृहामध्ये आरक्षणाबद्दल जे काही प्रस्ताव येतील ते शहर सुधार समितीकडे पाठविण्याची गरज आहे. शहर सुधार समितीकडे यावर चर्चा होवू द्या नंतर हा प्रस्ताव या सभागृहाकडे येवू द्या तो पर्यंत हा ठराव स्थगीत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव शहर सुधार समिती मार्फत ठेवण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. २७६/४ :**

सहाय्यक संचालक,नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मौजे मिटमिटा येथील गट क्र.९७/पैकी जमीन औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना (वाढीव हद्द)नुसार २४ मी. रूंद रस्ता या प्रस्तावाने बाधित क्षेत्र संपादन करण्यासाठी मिळकतधारक श्री.शेख हबीब पिता शेख अहमद यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दि.२४.०२.२००६ रोजी दिली आहे. उक्त खरेदी सूचनेनुसार ६ महिन्याच्या आत म्हणजे दि.२३/०८/२००६ पूर्वी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा सदरील आरक्षण मुक्त/व्यपगत होईल.

उपरोक्त आरक्षण खालील अर्जदार यांचे क्षेत्र सुमारे ३५०० चौ.मी. आहे. सदर भागाचा शिघ्र सिध्द गणक दर रू.५५०/- प्रती चौ.मी. असून वजावाटी जाता रू.१२ लाख इतका अंदाजे मोबदला होईल.

मात्र रस्त्याचा वापर होण्यासाठी मुख्य रस्त्यापासून सदर जागेपर्यंतचे संपूर्ण क्षेत्र संपादित करावे लागेल. यासाठी महानगरपालिकेने तयार केलेल्या अंमलबजावणी अहवाल नुसार सदरील २४ मी. रूंद रस्त्याने १.४४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी भूसंपादन करण्याचे प्रयोजन केलेले आहे. त्यासाठी भूसंपादनाचा खर्च अंदाजे रू.४९.५५ लाख दाखविलेला आहे. सदरील बाधित क्षेत्र मौजे मिटमिटा येथील गट क्र.१००, १०१, १०२, १०३, ९७, ९६ ह्या जमीनीतील आहेत.

सबब उपरोक्त आरक्षणाखालील संपूर्ण क्षेत्र संपादन करण्यासाठी व त्यास लागणारा भूसंपादन खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.उपमहापौर : विषय पत्रिकेतील दोन्ही विषय उद्याच्या शहर सुधार समितीमार्फत घेण्यात यावेत.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव शहर सुधार समिती मार्फत ठेवण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. २७७/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मूळ अर्थसंकल्पातील बजेटची तरतूद बदलून मिळणे बाबत.

| अ.क्र. | कामाचे नांव | पृष्ट क्र. | ऐवजी बदलून मिळणे |
|---|---|---|---|
| ०१ | जालाननगर भागात पथदिवे व्यवस्था करणे १०.००<br>बन्सीलालनगर भागातील बॅडमिंटन हॉलची दुरूस्तीची कामे करणे बाबत. १.०० | ११९ | प्रभाग ९४ मध्ये विविध ठिकाणी व्यवस्था करणे १०.०० लक्ष<br>प्रभाग क्र.९४ जालाननगर भागात फुटपाथ बांधणे. १.०० लक्ष |
| ०२ | बन्सीलालनगर शाळा रंगरंगोटी व दुरूस्ती करणे. २.५० | ११९ | बन्सीलालनगर भागातील बॅडमिंटन हॉलची दुरूस्तीची कामे करणे.२.५० लक्ष |
| ०३ | राहुलनगर भागात ड्रेनेज लाईन बदलणे २.५० | १२३ | प्रभाग क्र.९४ बन्सीलालनगर मधील जालाननगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. २.५० लक्ष |
| ०४ | बन्सीलालनगर बॅडमिंटन हॉलचे विद्युतीकरण करणे. १.०० | १२३ | प्रभाग क्र.९४ जालाननगर भागात फुटपाथ बांधणे १.०० लक्ष |

सुचक : सौ.अल्पा जैन अनुमोदक : श्री.विजय खुडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मूळ अर्थसंकल्पात प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ४ चे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७८/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, कांचनवाडी येथे महानगरपालिकेचे आयुर्वेदिक उद्यान बनविण्यात आले असून त्याची देखभाल करणे,त्यात औषधी वनस्पती लावणे इ.सारखी तसेच महत्वपूर्ण सुधारणा करणे तसेच मराठवाड्यातील एकमेव चांगले आयुर्वेदिक उद्यान बनविणेच्या दृष्टीने जे जे काही करावे लागणार आहे. ते करणेसाठी तसेच यातून मनपाला उत्पन्न मिळणेच्यादृष्टीने सदरील उद्यान खाजगी संस्थेला किंवा या विषयातील तज्ञ व्यक्तीला नेमणेसाठी सभागृहाची मान्यता होवून ठराव पारित करण्यात यावा व त्याची त्वरित अमंलबजावणी करण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.गजानन बारवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कांचनवाडी येथे बनविण्यात आलेल्या महानगरपालिकेचे आयुर्वेदिक उद्यानाची देखभाल करणे,त्यात औषधी वनस्पती लावणे इ.सारखी तसेच महत्वपूर्ण सुधारणा करणे तसेच मराठवाड्यातील एकमेव चांगले आयुर्वेदिक उद्यान बनविणेच्या दृष्टीने जे जे काही करावे लागणार आहे. ते करणेसाठी तसेच यातून महापालिकेला उत्पन्न मिळणेच्यादृष्टीने सदरील उद्यान खाजगी संस्थेला किंवा या विषयातील तज्ञ व्यक्तीला नेमणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.विनायक पांडे : चार महिने झाले मालमत्ताचा अहवाल आलेला आहे. त्यावर कधी चर्चा करणार. त्याची तारीख निश्चित करा. त्यावर जर चर्चा करायची नसेल तर मनपातील ऑडीट सेक्शन बंद करा. कशासाठी त्यांना पगार द्यायचे. कारण अहवाल तयार झालेला असून देखील त्यावर अजून चर्चा झालेली नाही. त्याची तारीख निश्चित करा.

मा.उपमहापौर : मालमत्ता विभागाच्या अहवालावर विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात येईल. ती आठ दिवसाच्या आत घेण्यात येईल.

श्री.काशिनाथ कोकाटे : सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेवून मालमत्ता कर आणि नोकर भरती ११२४ हे दोन विषय या सभागृहाचे अत्यंत महत्वाचे आहे आणि दोन्ही विषयावर स्थायी

समितीच्या सभेमध्ये चर्चा झालेली आहे. मालमत्ता विभागाच्या अहवालाची चर्चा या सभागृहामध्ये होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण त्यामध्ये लाखो रूपयांचा अपव्यय झालेला आहे. त्यासाठी लवकरात लवकर यावर चर्चा होवून योग्य निर्णय घ्यावा आणि त्याचप्रमाणे आपल्या असे निदर्शनास आणून देतो की, नोकर भरती संदर्भामध्ये ११२४ लोकांना घेण्याच्या संदर्भामध्ये चर्चा झालेली होती. त्यामध्ये चौकशी करण्याचा प्राथमिक अहवाल घेण्यात यावा. या संदर्भात पत्र दिलेले आहे. नोकर भरती आणि मालमत्ता याबद्दल विशेष बैठक लावण्यात यावी. त्याच्या प्रती सर्वांना देण्यात याव्यात आणि प्रशासन सर्वांना एका नियमाने चालविले असे सर्वांना दाखवून द्यावे, अशी माझी विनंती आहे.

श्री.संजय जोशी : मालमत्ता विभाग आणि नोकर भरती यामध्ये काय घोटाळे झाले या संदर्भात सर्व स.सदस्यांना माहिती देणे आवश्यक आहे. त्यासाठी लवकरात लवकर विशेष बैठक घ्यावी असी आमची विनंती आहे.

मा.उपमहापौर : मालमत्ता व नोकर भरती या विषयी जुलैच्या पहिल्या आठवड्यात विशेष सभा लावण्यात यावी.

यानंतर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.उपमहापौर यांनी जाहिर केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.